
विजय खाडिलकर
धर्म

# धर्म

(कथासंग्रह)

विजय खाडिलकर

(सर्व हक्क लेखकास्वाधीन)

ई साहित्य प्रतिष्ठान

# धर्म

लेखक श्री. विजय खाडिलकर
vijay.s.khadilkar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity. com
esahity@gmail. com

©esahity Pratishthan®2015

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन : ३० नोव्हेंबर २०१५

# श्री विजय खाडिलकर



कलावंताला त्याच्या कलेहून अधिक वेगळ्या ओळखीची गरजच नसते असे म्हणतात. ई साहित्य प्रतिष्ठानचे वाचक विजय खाडिलकर यांना खिडक्या या कथासंग्रहाचे लेखक म्हणून ओळखतात. त्यांच्या पहिल्या ई पुस्तकाला वाचकांची पसंतीची दाद मिळाली. त्यामुळे हे दुसरे पुस्तक. पहिल्या पुस्तकामुळे उंचावलेल्या अपेक्षांना हे दुसरे पुस्तक "धर्म" अधिक उंचीवरच्या पायरीवर नेईल याची आम्हाला खात्री आहे.

श्री विजय खाडिलकर यांच्या कथा वाचल्यावर हे जाणवते की या लेखकाने आपले लेखन आयुष्यभर जोपासले असते तर मराठीला एक विशेष लेखक मिळाला असता. पण फ़ार

विषादाची गरज नाही. बहुराष्ट्रीय कंपनीतून निवृत्तीनंतर त्यांनी आपली लेखनकला जोपासली आणि अनेक कथा, कविता, कथासंग्रह असा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून दिला. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या संपूर्ण खजिन्याची एक झलक म्हणता येईल. त्यांचा आजवरचा साहित्य प्रवास खाली देत आहोत.

खिडक्या, मायबोली प्रकाशन

लालबत्ती, अक्षर प्रकाशन

सरसरती सर. अक्षरमानव

परिक्रमा: शब्दांजली प्रकाशन    हे कथासंग्रह व

वसंतचाहूल: अक्षरमानव  हा कवितासंग्रह

पारंब्या:  अनघा प्रकाशन ..ही कोमसाप स्पर्धेत तृतिय पारितोषिक पात्र कादंबरी..

या शिवाय दिवाळी अंकातून कथा व कविता येत असतात..

श्री विजय खाडिलकर हे जी ए कुलकर्णी यांचे चाहते. त्यामुळे त्यांच्या कथांतून जी एंची झलक दिसते त्याचबरोबर त्याहून वेगळं लिहिण्याची उबळही जाणवते. मानवी नातेसंबंधांतली असहाय्यता आणि सौंदर्य यांचा वेध हे जीएंच्या कथांचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य. ते खाडिलकरांच्या कथेतूनही ठळकपणे प्रत्ययाला येतं. कथेला नाट्यापेक्षा काव्यगत सार्वत्रिकता हेही जिएंचं वैशिष्ट्य खाडिलकरांच्या कथेतून जाणवतं.

त्यांच्याचप्रमाणे पात्रांच्यामागची सामाजिक धार्मिक पार्श्वभूमी ठळक करताना काळ आणि परिसर यांत मात्र खाडिलकरांनी स्वतःचा वेगळा प्रांत चोखाळला आहे. विजय खाडिलकरांच्या कथांतून प्रत्ययाला येणारा धर्म हा surrealistic आहे. तो आहेही आणि नाहीही. वास्तव आहे. पण भिंती आणि

भितीच्या पलिकडे जाऊन दोन काठांना जोडणारा पूल आणि भिन्न प्रकृतींना जवळ आणणारा pull असे त्याचे स्वरूप जाणवते. सहृदयी वाचकांना भुरळ पडेल असे विजय खाडिलकरांचे कथानक आणि वाचताना रममाण व्हायला लावणारी त्यांची शैली यांचं गारूड वाचकावर खुप काळपर्यंत रहातं.

धर्म या कथासंग्रहातील, धर्म, वारं आणि काळा घोडा या तिन्ही कथांची वीण वेगवेगळी असली तरी मानवी मनाच्या गुंतवळयाचं आणि त्यातल्या धार्मिकतेचं या तिन्ही कथांतून वेगवेगळया रुपांतून आपल्याला दर्शन होतं. ग्रामीण वा शहरी कोणत्याही पार्श्वभूमीवर खाडिलकरांची लेखणी एखाद्या कसलेल्या चित्रकाराच्या ब्रशेसप्रमाणे काम करते. कथा अशी खुलत जाते की वाचणारी व्यक्ती कमळात भुंगा अडकावा तशी कथेत गुंतून पडते.

खुपच छान कथा आहेत. खुपच छान. अगदी वाचल्याच पाहिजेत अशा.

विजय खाडिलकरांच्या कथा तुम्हाला कशा वाटल्या ते जाणून घ्यायला आवडेल. तुमचा विस्तृत अभिप्राय आल्यास आम्ही ऋणी राहू. ई साहित्य प्रतिष्ठान हे साहित्यावरच्या चर्चेचं व्यासपीठ व्हावं ही मुख्य प्रेरणा आहे. ते तुमच्या अभिप्रायांतूनच साध्य होऊ शकेल.

धन्यवाद
टीम ई साहित्य

# दोन शब्द..लेखकाचे...

ई-साहित्य ह्या मराठी साहित्यविश्वातल्या नवीन संकल्पनेद्वारे निवडक का होईना, मराठी वाचकांपर्यंत पोहोचणं शक्य होतंय त्यांच्या अभिरुचिनुसार अनुकूल वा प्रतिकूल प्रतिक्रिया लेखकापर्यंत पोहोचल्या तर कदाचित मराठी साहित्यात कालानुरूप झालेले व अपेक्षित असलेले बदल एकमेकांपर्यंत पोहोचणं सोपं होईल.कसलाही अभिनिवेष न बाळगता झालेला हा अलिखित संवाद भोवताल समजून घेण्यास हातभार लावील. फ़ार अपेक्षा न बाळगता खिडक्या ह्या पूर्वप्रकाशित संग्रहातील अजून कांही निवडक कथांची ही छोटी आवृत्ति. भोवताल आणि निरिक्षणं वाचकांपर्यंत पोहोचवण्यात यशस्वी होईल अशी आशा आहे.

आताही मूळ संग्रहातल्या निवडक तीन कथा सादर केल्या आहेत. केवळ शीर्षकातून ध्वनित होणारा 'धर्म ' इथे अभिप्रेत नाही; तर मानवी नातेसंबंधातले सूक्ष्म कंगोरे अधोरेखित करणं हा उद्देश आहे. अगतिकता हा मानवी जीवनातला अविभाज्य घटक वेगळ्या पार्श्वभूमिचा वापर करून चित्रित करतांना केवळ रूपकात्मक असलेलं काळा घोडा हे शीर्षक आवश्यक तो परिणाम साधतं.

कोकणी बेरकीपणाबरोबरच ताणलेले नातेसंबंध वेगळयाच भाषिक वैविध्यासह सादर करतांना 'वारं' मधल्या त्या व्यक्तिरेखा समोर उभ्या रहातात. ह्या सगळयामधून व्यक्त होतांना वाचकाला त्या वातावरणात नेण्याची कळकळही आहेच..प्रतिसाद कसा असेल हे कळणं कठीण असलं तरी तूर्तास तो अनुकूल असावा अशी अपेक्षा करणंच ठीक.

धन्यवाद..

विजय खाडिलकर

लेखक

अर्पणपत्रिका

माणुसकी हाच धर्म
ही संवेदना जपणाऱ्याच्या
माणूसपणाला प्रणाम

# अनुक्रम


| कथेचे नांव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|
| १..धर्म | झपूर्झा दिवाळी २००९ |
| २.काळा घोडा | ग्रंथायन ऑगस्ट २००८ |
| ३.वारं | झपूर्झा मे २००८ |


सर्व कथा साहित्यसंस्कृति मंडळाच्या अनुदान योजनेअंतर्गत मायबोली प्रकाशनतर्फ़े 'खिडक्या' ह्या संग्रहात प्रसिद्ध झाल्या आहेत.

“Knock, And He'll open the door

Vanish, And He'll make you shine like the sun

Fall, And He'll raise you to the heavens

Become nothing, And He'll turn you into everything.”

— Rumi

(तेराव्या शतकातील सुफ़ी कवी)

# . . धर्म . .

वय झाल्यामुळे डबे पाठवणं रोझालिनने पाचसहा वर्षांपूर्वीच बंद केलं होतं. त्यामुळे घरी जाण्याची घाई नव्हती. आणि आता डबे पाठवणार तरी कोणाला? जवळपास रहाणाऱ्या कुटुंबातल्या एकेकटया माणसांसाठीच फक्त ती डबे पाठवी. पूर्वी ओळखीच्या ऑफिसवाल्यानाही पाठवीत असे. नंतर दुबई पर्व सुरू झाल्यावर एकाकी म्हाताऱ्याना जे डबे पाठवीत होती तेही हळूहळू कमी होत गेले. किती फ्युनरल्स् अटेन्ड केली नि आता कितीजण रहायले. आपलाही नंबर लागेलच की केव्हांतरी.

रोझालिन स्वतःशीच हिशेब करीत होती. संध्याकाळची सर्व्हिस संपल्यावर घरी परतताना ती हल्ली अशाच गोष्टींचा विचार करी. चर्चमधेसुद्धा फारशी जुनी माणसं भेटत नसत. नांवानिशी सगळयाना ओळखणारे जुने फादरही बदलले होते.

'हाऊ आर यू मिसेस् डायस?' रस्ता क्रॉस करून माहिम दर्ग्याच्या अलिकडे आपल्या नव्या खोलीवर जाण्याच्या विचारात जागीच उभी असलेली रोझालिन दचकली.

'आय् ॲम ओ. के. डोनाल्ड. हाऊ आर यू ऑल? हाऊ इज मॅडम?'

तिच्याहून बरीच लहान असूनही ॲनीला ती मॅडम म्हणे आणि बरोबरीच्या डोनाल्डला मात्र नांवाने हांक मारी. हे रेगो जोडपं चर्चमधे भेटलं की डोनाल्ड तिची आवर्जून चौकशी करी. मागेच जरा अंतरावर हळूहळू चालत असलेल्या ॲनीला तिने हात केला. ॲनीने उत्तरादाखल इंचभर जिवणी ताणली. त्यात तुच्छताच अधिक होती.

वयामुळे फेंगडं चालणाऱ्या नि पायघोळ कळकट फ्रॉक घातलेल्या रोझालिनकडे बघून, ह्या वयातही फॅशन करणारी ॲनी रेगो नेहमीच नाक मोडी. ॲनीला ती फारशी आवडत नसे. कारण कधीकाळी ती त्यांच्याच घरात आश्रित म्हणून आली होती.

हरकाम्या म्हणून सिनियर रेगोच्या क्लबमधे काम करणाऱ्या मारिओ डायसशी लग्न करून रोझालिन, रेगो कुटुंबाच्या बंगल्याच्या मागच्या बाजूला क्लबला लागून असलेल्या औटहाऊसमधे रहायला आली. तेव्हांपासून ती जरूर पडेल तेव्हां ॲनीला मदत करायला बंगल्यात किंवा मारिओला मदत करायला क्लबच्या शेडमधे नाहीतर बॅडमिंग्टन कोर्टवर साफसफाई करताना दिसे. मात्र मेंबर यायच्या वेळेला ती शक्यतो तिच्या रूमबाहेर पडत नसे. ॲनीला आवडत नसे म्हणून. . . . . . . . .

माहिमसारख्या आता गजबजलेल्या परिसरात मेनरोडकडे तोंड करून पूर्वी एक छोटा एकमजली बंगला उभा होता. रेगो व्हिला. आता तिथे चारमजली खाजगी सोसायटी उभी आहे. शतकाच्या सुरवातीला केव्हांतरी मंगलोरहून आलेल्या सिनिअर रेगोने तो बंगला खरीदला. मुंबईच्या बेटावर तेव्हां असे तुरळक बंगले होते. रेगोने केवळ पालनजी सोचपालच्या नोकरीसाठी मुंबईत स्थलांतर केलं होतं.

यथावकाश लग्न करून सेटल् झालेल्या रेगोने मागच्या कोर्ट यार्डला बंदिस्त करून तिथे क्लब चालू केला होता. तिकडे दुसरं महायुद्ध सुरू असताना इकडे स्वातंत्र्याच्या चळवळीला जोर आला होता. तरी गोरे सोजीर म्हणे कुणाच्या ओळखीने कधीतरी हया क्लबात येत. तेव्हां सुरक्षिततेच्या दृष्टिने रेगोने आपलं कुटुंब बायकोच्या माहेरी गोव्याला पाठवून दिलं होतं. छोटा डोनाल्ड तेव्हां दहाबारा वर्षांचा असेल. चारपांच वर्ष तिकडेच काढून कंटाळलेल्या सिनिअर रेगोच्या बायकोने स्वातंत्र्योत्तर काळात लगेच बोट पकडली नि मुंबईची वाट धरली.

तोवर रेगोने इकडे मेड आणून ठेवली होती; तिच्या मारिओ नांवाच्या मुलासकट ती आली होती. डोनाल्डपेक्षा थोडा मोठा असलेला मारिओ क्लबची सारी कामं करी नि दोघं मायलेक आऊटहाऊसमधे रहात. आल्या आल्या मिसेस् रेगोने तिला घालवून दिली तरी मारिओला हरकाम्या म्हणून ठेवून घेतला होता. मारिओ आता वयात आला होता. शिक्षणात गति

नसल्यामुळे रेगोने त्याला रिचर्डसनमधे फिटरच्या कामावर लावून दिला होता. आपल्या शिफ्ट संभाळून मारिओ क्लबची कामं करीच पण मिसेस् रेगोलाही मदत करी. त्यामुळे डोनाल्डलाही त्याच्या आऊटहाऊसमधे असण्याची संवय झाली होती.

'मारिओ गेट मी माय स्टफ व्हेन यू रिटर्न होम.' सिनिअर रेगोची दारूची मागणी.

शिफ्ट संपवून येतान मारिओ ती पुरी करी.

'मारिओ कॅन यू गेट मी सम कॅप्स्टन?' ग्रॅज्यएट झालेला डोनाल्ड रिकामा असताना पॉकेटमनीमधून सिगरेट ओढायला लागला होता. तेही मारिओच्या रूममधे जाऊन. त्याची ही मागणी मग पुरी करावी लागे. मारिओला तेव्हां तरी तसल्या संवयी नव्हत्या. होती ती मैदानी खेळांची आवड.

रेगोच्या क्लबमधले फक्त बॅडमिंग्टन नि टेबलटेनिस सारखे खेळ त्याला बायकी वाटत. नि कॅरमपत्त्यांसारखे बैठे खेळ त्याला मानवत नव्हते. म्हणून रिचर्डसनच्या टीम मधून तो कुठे कुठे फुटबॉल खेळायला जात असे. अशाच गोव्याला गेला असताना म्हाताऱ्या ममीला भेटायला गेला तेव्हां तिने लग्नाचा विषय काढलाच. तिनेच एक मुलगी बांन्द्रयाला मेड म्हणून पाठवली होती. हीच रोझालीन.

शिकण्याचं वय केव्हांच मागे पडलं होतं नि रिचर्डसनच्या नोकरीचा पगार सुरू झाला होता. डोनाल्डपेक्षा थोडा मोठा असलेल्या मारिओला मग लग्नाचे वेध लागले. . . . .

इकडे डोनाल्डही झेविअर्समधली डिग्री घेऊन बर्माशेलमधे चिकटला होता. त्याच्याही लग्नासाठी मिसेस् रेगो आतुरलेली होती. नात्यातल्या मुली बघणं नि क्लबमधे येणाऱ्या मेंबरकडे आडून विचारपूस करणं तिने चालवलं होतं. पोर्तुगीज चर्चजवळ रहाणाऱ्या नातलगांकडेही तिची विचारपूस सुरूच असे. पण डोनाल्ड दाद देत नव्हता. त्याला कॉलेज सोडताना नव्याने आलेली ॲनी आवडली होती. भायखळयाला का कुठे रहायची. तशी तिची माहिती काढून झाली होती पण तिला विचारायचा किंवा घरी सांगायचा धीर होत नव्हता.

एवढया मोठया बंगल्याची देखभाल नि साफसफाई कामवालीकडून करून घेणं मिसेस् रेगोला जमत नव्हतं. मारिओने औटहाऊसमधे कायमचं बिऱ्हाड करणं तिला पसंत नव्हतं. पण सिनिअर रेगोपुढे तिचा नाईलाज झाला. शिवाय नुकताच रिटायर्ड होऊन घरी बसलेला रेगो जरा जास्तच प्यायला लागला होता. त्यामुळे मारिओने त्याच्या पुढे पुढे करून त्याला गळ घातली.

'सर कॅन यू स्पीक टू मॅडम?'

'फॉर व्हॉट?'

'माय मदर वॉन्टस् मी टु गेट मॅरिड.'

रेगो हंसला. त्याला ही मस्केबाजी कळली.

'देन यू स्पीक टू हर. ॲन्ड व्हेअर इज द गर्ल?'

'शी इज ॲट बॅन्ड्रा विथ समवन.' रेगोच्या ग्लासात दारू ओतीत मारिओ मस्केबाजी करतच रहायला.

'ओके. ओके. आय विल फाइन्ड आऊट'

मिसेस् रेगोच्या ओळखीने मग बांद्रयाच्या नातलगांकडे मेड म्हणून आलेल्या रोझालिनला मारिओने मागणी घातली नि नंतर इथल्याच चर्च मधे लग्न करून ढगाळ रंगीत फ्रॉक नि रंगीबेरंगी बांगडया घातलेली रोझालिन नवी नवरी होऊन औटहाऊसमधे आली.

आल्या आल्या तिने दोन्ही सिनिअर्सची मर्जी संपादन केली. त्यामुळे वर्षभराने डोनाल्डशी लग्न करून आलेल्या ॲनीला कांहीच करता येत नव्हतं. तिची सासू, मिसेस् रेगो नवऱ्याबरोबर क्लबात पत्ते खेळत नाहीतर मेंबरांशी गप्पा मारीत बसे तेव्हां रोझालिनच तिच्या मदतीला येई. . . . . . . . . . .

विचारांच्या तंद्रीत ती मेनरोडवरून जरा आत तिची खोली असलेल्या बिल्डिंगजवळ पोहोचली. तेव्हां तिला दोन गोष्टींची आठवण झाली.

साधारण ह्याच वेळेला त्या छोटया बायलेनच्या कॉर्नरवर एक आंधळा मुस्लिम माणूस प्लास्टिकच्या मोठया बॅगमधे पॉपकॉर्नचे पुडे विकायला घेऊन उभा राही. थोडया थोडया वेळाने तो फक्त'पॉपकॉर्न' एवढंच बोले. जाणाऱ्या येणाऱ्यांचं सहज लक्ष जाई. सहज पाहिलं तर तो आंधळा आहे हे कुणाच्या लक्षात येत नसे. पण कुणी एखादं पाकिट घेतलंच तर तो जेव्हां पैसे बरोबर मोजून घेई तेव्हां कळे कि हयाला दिसत नाहिये.

केवळ दयेपोटी रोझालिन पैसे असतील तेव्हां एखादं पाकिट घेई. त्यामुळे तोही तिला आवाजावरून ओळखायला लागला होता. केव्हांतरी सहज म्हणे.

'आंटी आज दो पाकिट ले लो ना. आज कुछ धंदा हुआ नही.'

बिचारी रोझालिन मधेच केव्हांतरी दोन पाकिटं घेई नि परत आल्यावर बिल्डिंगजवळ आत खेळणाऱ्या मुलांना वाटून टाकी. मुलंही खूष होऊन'आंटी आंटी' म्हणून गिल्ला करीत.

वरून पहाणारी अम्मा एकदा म्हणाली होती.'रोजालिनबाय् तू पोरांची आदत बिगडवू नुको हां. न्हायतर रोज तुज्या फाटी लागतीन.'

रोझालिन कसनुसं हंसली. तिलाही केव्हांतरी अम्मासारखी नातवंडं असावीत असं वाटेच!

ती नुसताच सुस्कारा सोडी.

तिच्या लक्षात आलं. आज तो आंधळा नव्हता तिथे. नि दुसरं . .

आपण डिनरसाठी ब्रेड घ्यायला विसरलो हेही तिच्या लक्षात आलं. हल्ली रात्री ती नुसताच ब्रेड नि कॉफी घेऊन झोपत असे. पैसे पुरवून वापरावे लागत. डबे पाठवणं बंद केलं होतं नि डॉक्टर डिसोजाच्या दवाखान्यातली एकवेळची कंपाउन्डरची नोकरीही सुटली होती. ते पाचशे रूपयेही बंद झाले होते. मारिओच्या पोस्टातल्या पैशांच्या व्याजावरच निभावून न्यावं लागे. . .

वयाची पन्नाशी उलटतानाच मारिओ लिव्हरच्या आजाराने गेला. तेव्हांपासून जवळ पास वीसेक वर्ष तिने हे डबे पाठवण्याचं काम नि जोडीला संध्याकाळची कंपाउन्डरची

नोकरी केली. त्यातली दहा वर्ष तर तिने विल्फ्रेडलाही पोसला.

पिऊन पिऊन मरण्याआधी मारिओने दत्तक म्हणून आणलेला त्याच्या कझिनचा मुलगा विल्फ्रेड. गल्फला जाऊन आल्यापास्नं गेली पंधरा वर्ष मालाडला वेगळा रहात होता. त्याच्याशी तिचं कधीच पटलं नाही नि तोही कधी तिला भेटत नसे. तिच्या जागेचा प्रॉब्लेम झाल्यापासून तर त्याने संबंधच तोडले होते.

डोनाल्डने इस्टेट विकल्यावर बिल्डरकडून पैसे मिळण्याच्या आशेने एकदा येऊन गेला तेव्हां गोड गोड बोलला होता. तिला ओल्डएज होममधे ठेवून पैसे घेऊन जाण्याचा त्याचा विचार होता. पण डोनाल्डनेच पुढाकार घेऊन तिला त्याच बिल्डरच्या दुसऱ्या प्रोजेक्टमधे ही तळमजल्यावरची गॅरेजेसना लागून असलेली एक खोली घेऊन दिली. त्यामुळे ती अगदीच रस्त्यावर पडली नाही. डोनाल्डचे हे उपकार स्मरूनच ती ॲनीकडे दुर्लक्ष करी.

बिल्डिंग बहुतेक मुस्लिम लोकांची नि भोवतालची वस्तीही तशीच. तरी तिचं कांही अडत नव्हतं. सगळीजणं तिची विचारपूस करत. आताही तिला रिकाम्या हाताने परतलेली बघून वॉचमनशी बोलणारा रशीदमियाँ पुढे आला नि म्हणाला.

‘आन्टी आज आप ब्रेड लाना भूल गई क्या?’

त्याला तिचं रूटीन माहित असावं नि तिची आर्थिक स्थितीही.

‘हां रे. वो डोनाल्डने कुछ पूछा तो हम दिमागमे कुछ सोचते सोचते आगे चला आया. और कॉर्नरपे वो पॉपकॉर्नवालाभी नही था. अब क्या करेंगा. खाली कॉफी पीकर सो जाएंगा.’

‘ऐसा क्यूँ? ये रामसिंग लाके देगा. नही तो तुम इधरीच ठेहरो. हम घरमे कुछ रोटी होगा तो ले आएगा.’

'रहने दो रे. बुढा आदमीका कितना फिकर करेंगा तुम. वो हमारा बेटा उधर मजा कर रहा है. तुम कायको तकलिफ करेंगा.'

'ऐसा क्यूँ बोलती हो. हमभी तुम्हारे बेटेजैसाच है ना.'

'थँक यू सो मच डिअर. पर हमको जादा भूक नही लगता ना.'

हा संवाद संपायच्या आतच रामसिंगने सिक्युरिटी ऑफिसमधे ठेवलेल्या आपल्या डब्यातला ब्रेड आणून रोझालिनच्या हाती दिला. तिला एकदम गंहिवरून आल्यासारखं झालं.

तिच्या तोंडून फक्त'थँक्यू डिअर' एवढेच शब्द बाहेर पडले.

तशीच ब्रेड हातात धरून घरी आल्यावर तिला थकल्यासारखं वाटलं म्हणून जरा तिच्या खिडकीजवळ असलेल्या एकुलत्या एका इझीचेअरवर टेकली. हीसुद्धा तिला डोनाल्डने नव्या फ्लॅटमधे शिफ्ट होताना दिली होती. जुन्या घरात एका खोलीत राहील एवढाच संसार होता. हया खोलीत येताना तो दोन हातात घेऊनच ती आली होती. तिचे डबे नि थोडीशी ॲल्युमिनिअमचीभांडी. बस्स्. क्लबमधलं एक जुनं डायनिंग टेबल तिच्या घरात होतं तेही तिचा दुबईवाला लेक घेऊन गेला होता.

खुर्चीत बसून जडावलेले पाय मोकळे करताना तिचं लक्ष समोरच्या भिंतीकडे गेलं. खोलीच्या मधोमध असलेल्या एकुलत्या एक पिवळया बल्बच्या प्रकाशात लास्ट सपरचं ते चित्र न्याहाळून पहाणं हा तिचा विरंगुळा होता. कॉफी पिताना त्या चित्राकडे बघून तिला अगदी पोट भरल्यासारखं वाटे. दुसऱ्या भिंतीवर मारिओचा फोटो नि डॉन बॉस्कोचं कॅलेन्डर. आणि दरवाजाच्या वर एक क्रॉस. ती बसली होती त्या खिडकीच्या बाजूला रामसिंगने तिला एक फळी मारून दिली होती. तिथे अल्टार करून तिने जीजस नि मेरीचे दोन फोटो ठेवले होते.

पुढयात जमेल तेव्हां नि असली तर एकादी कॅन्डल लावी. . .

असेच तिचे दिवस लोकांच्या सदिच्छांवर चालले होते. खरं तर जन्मापासूनच हे आश्रिताचं जिणं तिच्या वाटयाला आलं होतं. तिला वाटलं होतं मारिओशी लग्न झाल्यावर तरी आपण नेटका संसार करू. पण कसलं

काय. एकतर मारिओ रोजावर होता. नि जे कांही शेदिडशे मिळत त्यातले दारूवर उडवी. मात्र तो सिनिअर रेगो असेपर्यंत चांगला वागला. नंतर हे व्यसन त्याला लागलं. बहुतेक क्लबमधल्यांच्या संगतीमुळेच असेल. त्याना पाजता पाजता आपणही प्यायला लागला. मुलबाळ नव्हतं तरी संसार रेटायला रोझालिनला ॲनीवर अवलंबून

रहावं लागे. विशेषतः मारिओने उनाड विल्फीला दत्तक घेतल्यावर. म्हणजेच घरात आणून ठेवल्यावर. .

डोक्याने बेताचाच असलेला विल्फ्रेड दत्तक घेतला तेव्हां शाळेच्या वयाचा होता. त्याला चांगल्या शाळेत घातला तरी टयूशन वगैरेची चैन रोझालिनला परवडणारी नव्हती. मारिओ भले त्याचे लाड करी पण रोझालिन त्याच्याशी कडक वागे. त्यामुळेच तो तिचं फारसं ऐकत नसे. त्यावेळी ते सर्व रेगोच्या औटहाऊसमधेच रहात होते. सिनिअर रेगो आजारी असल्यामुळे डोनाल्डलाच मारिओच्या मदतीने क्लबची व्यवस्था पहावी लागे. विल्फी तर शाळेच्या वयाचा. तरी मारिओने त्याला एखाद्या रविवारी चर्चमधून डायरेक्ट क्लबला येणाऱ्या मेंबरांसाठी कांही आणायला पाठवलं तर सरळ पळूनच जायचा. विखुरलेलं सामानही लावायला त्याला जमत नसे. अशा हया बिनकामाच्या विल्फीलाही रोझालिन पोसत रहायली. . . . .

'आन्टी खाना खा लो अब. नौ बजनेको आये.'

खिडकीखालून रामसिंगची हांक ऐकू आली. तशी रोझालिन भानावर आली नि कॉफी करायला उठली. आधी भांडयात दूध बघितलं नि जरा जास्तच कॉफी ठेवली. एक कप रामसिंगलाही द्यावी म्हणून. थोडया वेळाने खिडकीशी येऊन मळका पडदा सारून तिने रामसिंगला हांक मारली नि म्हणाली

'रामसिंग , थोडा कॉफी पिएंगा क्या? बेटा तुम्हारे वास्तेभी बनाया है.'

'रखो आंटी. बादमे पिएंगा.' त्याला हे तिची परतफेड करणं आवडायचं नाही. ती मायेपोटी करतेय् हे माहित असून सुद्धा. नको म्हटलं तर ती आणखीच दुखावेल ही भीति.

एकदा ती म्हणाली होती.

'तुमको हमारे हातका चलता नही क्या? माँका कोई जात धरम नही होता.'

रामसिंग मुकाटपणे जाऊन पिऊन येई. तो होता राजस्थानी खत्री. पण बारा गांवं फिरून आल्यामुळे हे छूतअछूत वगैरे त्याला अडत नसे...........

कुटुंब गांवी ठेवून इथे गॅरेजच्या एका कोपऱ्यात राहून बारा तास ड्युटी संभाळत होता.

गॅरेजचे दोन गाळे इरफान ठाकूर नांवाच्या कोकणी मुसलमानाचे. त्यातल्या एका कोपऱ्यात रामसिंगची पथारी. हया इरफानची अम्माही केव्हांतरी वरून सालन पाठवी नि त्याच्याशी पाव खाऊन रामसिंगचं काम भागत असे.

एका हिंदूच्या दोन वेगवेगळया धर्माच्या आया , आपल्या मुलांसारखीच त्याची काळजी घेत.

ही असली नातीच टिकतात. नाहीतर ॲडॉप्ट केलेला विल्फी रोझालिनला का सोडून गेला असता !

ख्रिसमसला किंवा ईस्टरला रोझालिन अस्वस्थ व्हायची. कारण लोकांसाठी केक बनवण्यात तिची हयात गेली. जुन्या पद्धतिचं केकचं भांडं तिने अजून जपून ठेवलं होतं. पण आता कोणासाठी बनवणार नि सामान कोण आणून देणार? आता ती पैसे असतील त्याप्रमाणे बेकरीतला स्लाईसकेक आणते नि सगळयाना देते. कधी ॲनीने केक पाठवलाच तर त्यातला मग ती रामसिंगसाठी राखून ठेवते.....

ॲश वेड्नसडेपासून तिचे उपास म्हणजे ती नॉनव्हेज खात नसे. आता तिला उपासच घडत होते म्हणा ! पूर्वी गुडफ्रायडे झाला की तिची लगबग सुरू व्हायची. अशीच लगबग डिसेंबरातही व्हायची. तेव्हां ती

रेगोच्या घरात रहात होती. त्यामुळे औटहाऊसमधून वास यायला लागले की ॲनी आपलीही केकची ऑर्डर देऊन टाकायची.

आता ती बुधवार शुक्रवार संध्याकाळची कॉफीही करत नाही. हातात रोझरी घेऊन खिडकीसमोर इझिचेअरमधे बसलेली रोझालिन जा ये करणाऱ्याना फार पवित्र वाटे. मग रामसिंग स्वतःच तिला कॅन्डल आणून देई .

'कितना करता है रे तुम हमारे वास्ते. .'रोझालिन संकोचाने म्हणे. पण रामसिंगलाही मग पवित्र वाटे.

वरच्या मुस्लिम कुटुंबात तिचा पेपरडिशमधला केक पोहोचे नि ईदत्योहारला त्यांच्याकडची रंगीत कागदातली मिठाई खाली येई. अगदी रामसिंगसाठीसुद्धा. क्वचित् रामसिंगही गांवाहून आलेली भेट देत असे. अशी ही देवघेव सणावाराला चाले नि रशिदमियाँ त्यात पुढाकार घेई.

रोझालिनने बीफ खाणं सोडलं होतं नि वरच्या कुटुंबात पोर्क चालत नाही हे दोन्हीकडे कटाक्षाने लक्षात ठेवलं जाई. रामसिंगला तर दोन्ही वर्ज्य हेही पाळलं जात असे. त्याचा उच्चार सुद्धा न करता . असली ही अबोल नाती कटाक्षाने जपली जात होती; गेली पांचसहा वर्ष. म्हणजे रोझालिन इथे रहायला आल्यापासूनच.

इरफानचे अब्बा पैंगबरवासी झालेले त्यामुळे त्याची अम्मा खूप दिवस बाहेर पडत नसे.

त्यामुळे तिची सून केव्हांतरी रोझालिनकडे कांहीतरी घेऊन येई.

'आंटी आपके वास्ते अम्माने भेजा.' एवढंच बोलून परत जाई. रोझालिन तिच्याकडे बघतच राही. अब्बा गेल्यामुळे दुबईहून इरफान परतला नि तेव्हांपासून ही बुरखा वापरायला लागली तरी त्यांचं कोकणी मराठी चांगलं बोले. पण हया खडबडीत रूपाच्या पण मऊ मनाच्या आंटीला ती लाजे. अम्मा क्वचित् बाहेर पडलीच तर रोझालिनला हांक मारल्याशिवाय पुढे जात नसे.

आता तिच्या गळयात काळी पोत नव्हती पण कानात खूपशा बाळयामात्र तशाच होत्या. ती फक्त सफेद गोल साडी नेसे नि त्यावर

अंगभरून चिकनची चादर ओढी. कधीकाळी ती रूपाने उजवी असावी नि तरीही किती साधी रहायची हयाचं रोझालिनला कौतुक वाटे.

'रोजालिनबाय् , मी जरा लेकीच्या घराकडे जाऊन येत्य गे . ध्यान ठेव हां नि संबालूनऱ्हाव.'

'तूबी सोताची कालजी घे.' खिडकीशी येऊन मान हलवीत रोझालिन तिच्याच भाषेत बोले.

'रामसिंग सबका ध्यान रख मै आनेतक.' हे रामसिंगसाठी.

श्रीवर्धनजवळ कुठल्याशा गांवात लेक दिलेली. घरी बागाईत. त्यामुळे परत येताना अम्मा कायबाय घेऊन येई. त्यातले फणसाचे गरे दोघानाही मिळत. ते बघून रशीदमियाँ हंसून म्हणे.

'ऐसी अम्मा सबको मिले.'

खरंच अशी अम्मा सगळयानाच मिळो. रोझालिन दुवा मागे.

तिला आठवलं कि ती नुकतीच रहायला आली तेव्हां एकदा माहिमच्या दर्ग्याचा उरूस असताना ती गर्दीत सांपडली. त्या दिवशी संदलची मिरवणूक होती. तिला कांही एवढी कल्पना नव्हती. ती नेहमीसारखी रस्ता क्रॉस करून यायला नि दर्ग्याच्या बाजूने मिरवणूक यायला एक गांठ पडली. ती गर्दी बघून गांगरली. पण अर्ध्या रस्त्यावर आल्यावर तिला मागेही फिरता येईना.

तेवढयात तिला इरफान दिसला. पुढे होऊन त्याने तिला अलगद गर्दीच्या मधून फूटपाथवर आणलं.

'तुम कैसा गॉडके माफिक आ गया रे. तुमको कैसा मालूम हम इदर अटक गया?'

'अम्मा बोली. उसनेच तुमको लानेके वास्ते भेजा.'

'थँक गॉड. अम्मा हमारा बहोत फिकर करता है.'

'वो तुमको बोली थी ना आज संदलके दिन मत जाओ. भीडमे फँस जाओगी तो.'

'येस् डिअर. पर हम कैसा भूल गया क्या मालूम. गॉड ब्लेस यू माय चाऊल्ड! तुम टाइम पर आ गया नही तो हम भोत डर गया था वो क्राउड देखके.'

अशी ही न सांगता संवरता जपली जाणारी अबोल नाती. गॉड इज रिअली ग्रेट.

. . . .

रामसिंग कॉफी प्यायला आला तेव्हां तिला आठवण झाली. वाटलं हयाला विचारावं.

दोन दिवसांपूर्वी घरात कुणी नाही म्हणून इस्त्रीवाल्याने इरफानच्या घरचे कपडे तिच्याकडे ठेवायला दिले. नंतर इरफान येऊन घेऊन गेला. तो फारसं बोलत नसे. म्हणून त्याला विचारायचं तिला सुचलं नाही. कपडयांमधे एक वेगळं गांठोडं नुसत्या पडद्यांचंच होतं.

'रामसिंग , उपर कुछ त्येवार है क्या?'

'क्यों?'

'अरे वो इस्त्रीवाला कितना कपडा लाया था. एक तो पूरा पडदेका गठ्ठा था.'

'होगा कुछ ईदविद.'

'कितना बार ईद होता हाय.'

'आंटी उनका चारबार ईद होता है. अभी रोजे तो थे नही मतलब ये रमझानवाला ईद नही होगा.' इतक्यात खिडकीसमोर उस्मान , इरफानचा मुलगा येताना दिसला.

रोझालिनला रहावलं नाही.

'रे उस्मान , तुमारा कुछ ईदका त्येवार है क्या?'

'हां आंटी. दोतीन रोज बाद है.'

'ये कोनसा ईद रे?' मधेच रामसिंगने विचारलं.

'ये हमारा प्रॉफेटका जनमदिन है.' उस्मान इंगलिश मिडियममधे शिकत होता.

'अच्चा. तो ऐसा बोल ना कि ये हमारा ख्रिसमस जैसा त्येवार है.' रोझालिनचं कुतूहल संपलं.'तो हम तुमारावास्ते केक बनाएंगा. तुमारा ग्रॅनी हमेशा हमारावास्ते मिटाई भेजता है.'

उस्मान लाजल्यासारखा न बोलताच वर गेला. तो आता बडी अम्माला सांगणार हे जाणून रामसिंग रोझालिनला म्हणाला.

'आंटी तुमभी ना. . किसको क्या बोलनेका समझता नही.'

'क्या हुआ? हम अच्चासे बोला. उसका अम्मा हमको कुछ मिटाई भेजताच है.'

खांदे उडवून रामसिंग निघून गेला.

रोझालिनला इकडे ख्रिसमसची स्वप्नं पडायला लागली. खूप वर्षात तिने ख्रिसमसला नवा फ्रॉक शिवला नव्हता. आता गेल्या ख्रिसमसलाही जमलं नाही. आधी थोरली मिसेस् रेगो नि नंतर ॲनी बऱ्याचदा तिला कापड आणून देत नि ती शिवी. ते फ्रॉक मग तिला वर्षभर पुरत. आता ते बंद झालं होतं. कापड आणणं नि शिवणं दोन्ही जमत नव्हतं. परवडत नव्हतं नि धड दिसतही नव्हतं. मारिओ असताना शिवलेला एक ब्ल्यू कलरचा फ्रॉक ती अजूनही वापरत होती. ख्रिसमसच्या माससाठी जाताना गळयाभोवती सफेद स्कार्फ बांधी. नि त्याच फ्रॉकवर डोक्याला काळा हेडस्कार्फ घालून ती फ्यूनरल अटेन्ड करी !. .

'आंन्टी बत्ती बुझाव और सो जाव.' रामसिंगची हांक ऐकून ती भानावर आली.

दिवा बंद करून ,रोझरी हातात घेऊन ती कोपऱ्यातल्या नवारीच्या खाटेवर बसली. जुन्या घरातली मोडकी खाट. हीसुद्धा रामसिंगने रिपेअर करून नि पुन्हा नवार आणून स्वतःच्या हाताने विणून दिली होती !

रस्त्यावरच्या दिव्याच्या उजेडात मेरीच्या फोटोकडे बघत तिची प्रेअर सुरू झाली. . .

मेरीच्या दयार्द्र चेहऱ्याकडे एकटक बघत प्रार्थना करता करता तिला मेरीच्या जागी अम्मा दिसू लागली. मेरीच कधी कधी तिच्या रूपाने मदत करतेय् असं वाटलं. अवर लेडी ऑफ माऊन्ट. बान्द्रयाच्या मोतमाऊलीसारखी. तसंच ख्राईस्टच्या जागी कधी डोनाल्ड दिसायचा तर कधी हा रामसिंग. ते खरंच गॉडचाईल्ड असल्यासारखे वाटत. रिअल होली स्पिरीट !

प्रार्थना म्हणताना विचार येत गेले नि मग झोपही. बसल्या जागीच मग ती आडवी झाली...

पुढच्या आठवड्यात खरंच ईद असल्याचं तिला रशीदमियाँकडून कळलं नि तिला एकदम उत्साह वाटायला लागला. वाटलं ईद नि पुढे ईस्टर आगेमागे आली हयात कांही दैवीयोजना असावी. खरंच गॉड इज ग्रेट. तिने मग उत्साहाने डबे शोधायला सुरवात केली. थोडंफार सामान हातीं लागलं. फक्त संध्याकाळी चर्चहून येताना एग्ज आणायला हवीत. बस्स्. ठरलं.

ईस्टरच्या आदल्या दिवशी केक करायचा नि मासहून आल्यावर सगळयाना द्यायचा. दोन दिवसानी ईद तर होऊन जातेच आहे. नंतरच्याच रविवारी इरफानच्या नि रशीदच्या फॅमिलीला केक पाठवायचा. नुसत्या विचाराने च तिला खूप बरं वाटलं. किती करतात हे लोक आपल्यासाठी आपण कांहीच करू शकत नाही ! निदान केक तरी देऊ.

सुस्तावल्या दुपारी थोडंसं जेवणाचं करून ती अशीच विचार करत बसली असताना समोरच्या रस्त्यावर टॅक्सी थांबली. त्यातून इरफानची अम्मा नि बायको, दोघी सासवासुना उतरल्या. मुलं शाळेत गेल्यावर बहुतेक त्या दोघी शॉपिंगला जाऊन आल्या असाव्यात. ईदची खरेदी करायला. आत येऊन आपल्या घरी जाण्यासाठी दोघी वळल्या नि आठवण झाल्यासारखी अम्मा परत फिरली. सगळया पिशव्या घेऊन सून वर गेली नि एक छोटी पिशवी घेऊन खिडकीखालून वळसा घालून अम्मा रोझालिनच्या खोलीकडे वळली. तिला डायरेक्ट बाहेरून दरवाजा होता. तिला येताना बघून रोझालिन दाराजवळ आली तोवर ती आत आलीसुद्धा.

'गे रोझालिनबाय् , तुजाबी तेवार आलाय् ना गे? म्होरल्या हप्त्याला. रामसिंग बोलला.'

'हां गो. मी तेचाच इचार करत बसली होती. वाटला तुमच्यासाटीबी केक बनवेल.'

'हां. तो तं तू बनवशीत गे. पन तेच्याआदी तुजा सोताचा काय बगशीन् का नाय्.'

'माजा काय बगनार. पोराबाला काय माजीजवल नाय्. ही तुजी पोरा तिच माजी.'

'तां मानतंस ना? मग माजाबी शब्दुद मान. हा कपडा हान्लय् तुज्यासाटना. तेचा एक डरेस शिवून टाक तुज्या सोतासाटी. ह्या टायमाला नवीन डरेस घालून जा नि सगल्यांसाठी अल्लाजवल दुवा मांग.'

क्षणभर रोझालिनला कळेना की काय बोलावं. ती मनोमन हेलावून गेली. तिने अम्माचे हात हातात घेऊन दोनदोनदा थॅन्कयू म्हटलं. अम्मा तिच्या मोडक्या खुर्चीवर टेकली. तिच्याही डोळयात पाणी आलं. रोझालिनने मग तिला पाणी पुढे केल ंनि म्हणाली.

'अम्मा , वो रशीद बोला वो तुम सच किया. तुम सबकी अम्मा है.'

'ती तं मी हायच. तूबी तशीच सगल्यांशी दुवा करते ना. पोराबाला अशा दुव्यानंच बडी होतात गे. चल. मी वर घराकडे निगतंय् आता. पोरा शालेतून येतीन्. पर तू तो डरेस शिवून टाक. तुजा मशीन चालना जाला तं वर ये.'

रोझालिनने मान हलवली. ती बोलूही शकत नव्हती इतकं तिला भरून आलं. संध्याकाळी मग तिने तो कपडा सगळयाना दाखवला. अगदी लहान मुलांच्या उत्साहाने. मग रामसिंगला कॉफी प्यायला बोलावून तिने एक गोष्ट सांगितली.

तिच्याकडे खरोखरंच चांगला फ्रॉक नव्हता ! पण हे सांगताना तिने अजून एक विचित्र गोष्ट सांगितली. म्हणाली.

'रामसिंग हमारापास एकीच ड्रेस था. हम सोचता की वहीच पेनकर हम गॉडका पास जाऐंगा. पर ये अम्माने हमारा बातको कैसा समज लिया देखो. गॉड इज ग्रेट.'

'आंटी तुम ऐसा बात क्यूँ करता है. तुमको अभी बहोत साल बाकी है.'

'नही रे. हमारा जानेका टाईम आएगा दिखता.'

'तुम एकबार अपने लडकेसे बात करो.'

'वो हमारा बेटा हैच नही. हम चर्चमे फादरको बोलके रक्का है. वो सब देख लेगा. लेकिन तुमको एक बात बोलताय् की हमको कुच हो जाएगा तो तुम जाके फादरको बुलानेका.'

'कहाँ इतना दूरका सोचता है तुम.'

'दूरका नही डिअर. कभी तो होगाच ना. तब तुम हमारा मदत करना. ऐसाभी तुमीच हमको मदत करता ना. तो एक बात सुनके रखना. हम सोचता था की जानेके टाईम हम अपना पुराना ड्रेस पैनेगा लेकिन अब ये अम्माने जो दिया है वही पैनके जाएगा.'

रामसिंगला कळेना विषय कसा बदलायचा ते. बिचारा स्वस्थ बसून राहयला.

'तुम समजा ना हम क्या बोला. येच ड्रेस हम पैनके जाएगा.'

रामसिंग मग सरळ उठूनच गेला.

दुसऱ्या दिवशी तिने आपली छोटी हातमशीन खाटेखालून काढली. टेपनी मापं घेऊन ती कपडा कापायला बसली. . . . .

दोन दिवसात तिने मोठया मेहनतीने आपल्या मापाचा पण जरा ढगळ असा फ्रॉक शिवला. कधी नव्हे ते वर गेली. अनायासे ईद होतीच. तिने सगळयाना ईदच्या शुभेच्छा दिल्या नि मोठया उत्साहाने तिने तो फ्रॉक अम्माला दाखवला.

'अम्मा तुम सबको ईदका कॉम्प्लिमेन्ट देनेको आया. तुमलोग क्या बोलता हमको मालूम नही. विश यू ऑल हॅपी ईद.'

अम्माने सुनेला सांगून तिच्यापुढे मिठाई ठेवली.

'रोझालिन फुडल्या ऐतवारी तुजाबी तेवार हाय. तू बोलली तसा केक बनव.'

'हां. वो हम बनाएंगाच. लेकिन हम तुमको ये दिखानेवास्ते लाया. तुम जो कपडा दिया था उसका फ्रॉक हम बनाया.' असं म्हणून तिने पुडकं सोडून फ्रॉक अम्माला दाखवला.

'अच्चा है ना. भोत टाईमसे हम कुच सिलाई नही किया.'

'तू तं बाय सगलाच जानते. अच्छा सिलाया है. अब तेवारके दिन पेनना.'

'हां इस वास्तेच तुम कपडा दिया ना. अच्चा हुआ. लेकिन एक औरभी बात है. आज नही बोलेगा. आज तुमारा तेवार है ना. बादमे कभी बोलेगा.'

मिठाईचा तुकडा घेत रोझालिन घरी परतली. तिला हा एक ईश्वरी संकेतच वाटत होता.

आपल्याकडे नवा फ्रॉक नाही नि आता आपण ईस्टरच्या दिवशी नवा फ्रॉक घालून चर्चला जाऊच. पण आपली पुढची सोयही त्या ऑलमाईटी गॉडने करून ठेवली ! ती तिनतिनदा म्हणत राहयली.'गॉड ईज ग्रेट.' . . . .

रोझालिनने ठरल्याप्रमाणे नवा फ्रॉक घालून लहान मुलांच्या उत्साहात ईस्टर साजरा केलाच पण केकही सर्वांना नेऊन दिला.

सकाळच्या प्रेअरला तिने प्रभूला साकडं घातलं.

'माझे शेवटचे दिवस हया माझ्या मानलेल्या माणसांच्या संगतीत शांततेत जावोत. कुणालाही त्रास न देता मला तुझ्या पायाशी यायचंय्.'

प्रभूने तिची प्रार्थना ऐकली असणार. नक्कीच !

जेमतेम पावसाळा संपला नि सप्टेम्बरमधे तिने माऊन्टमेरीच्या फीस्टसाठी जाऊन मेरीची प्रार्थना केली. कारण तोच तिचाही वाढदिवस होता ! सत्तरावा !

तिने मेरीजवळ सगळयांसाठी प्रेअर केली नि परतली ती साधारणशा सर्दीतापाने आजारी पडली. ती जराही घाबरली नाही. कारण तिला हाही एक ईश्वरी संकेतच वाटला.

अम्मा तर येऊन गेलीच पण तिच्या सुनेने सूप आणून दिलं. रशीदने तिला नको नको म्हणत असताना डॉक्टरकडे नेलं. रामसिंग बिचारा आपली डयूटी संभाळून तिला मदत करी. ब्रेड आणून देई. क्वचित् कॉफीही करून देई.

विशेष म्हणजे रविवारी सकाळी ती चर्चला जाऊ शकली नाही म्हणून संध्याकाळी दोघं रेगो पतिपत्नी भेटायला आली. डोनाल्डने तिला थोडे पैसेही देऊ केले. ॲनीनेही नाक न मोडता तिची चौकशी केली. नि कांही लागलं तर कळव म्हणून ते निघून गेले.

रोझालिनने एक केलं. रामसिंगची डोनाल्डशी ओळख करून दिली नि सांगितलं की मला कांही वाटलं तर मी ह्याला पाठवीन. तशी वेळ दोनच दिवसानी येणार हे बहुतेक तिला कळलं होतं ! . . .

त्या रात्री रोजच्याप्रमाणे तिने कॉफी केली नाही. तिला जरा अस्वस्थ वाटलं. तरी खिडकी जवळ येऊन तिने नेहमीसारखी रामसिंगची चौकशी केली. पण तो डयूटी संपवून झोपायला गेला होता. डयूटीवरच्या वॉचमनने तिला विचारलं.

‘उसको जगाऊँ क्या?’

‘नही नही. तुम अपना काम करो. हम अभी सो जाता है.’

झोपायसाठी म्हणून दिवा घालवून ती मागच्या भिंतीजवळ असलेल्या खाटेवर बसली. नेहमीप्रमाणे हातात रोझरी घेऊन. लक्ष समोर खिडकीशेजारच्या अल्टारवर ठेवलेल्या फोटोकडे. मधेच माऊन्टमेरीला जाताना घातलेल्या, शेजारी जुन्या ट्रंकेवर घडी करून ठेवलेल्या नव्या फ्रॉकला कुरवाळत तो हातात घेतला नि मेरीच्या फोटोकडे पहात मनाशीच म्हणाली.

'तूच तर माझी सगळी व्यवस्था केलीस. आता त्या ऑलमाइटीकडे माझ्यासाठी प्रे कर नि मला तुझ्याकडे बोलावून घे.'

डोळे मिटून प्रार्थना करताना तिला डुलकी लागली नि ती स्वप्नांच्या दुनियेत गेली. तिला सगळीकडे प्रकाशच प्रकाश दिसत होता. तिला खूप हलकं हलकं वाटत होतं. तिला मेरीचा पवित्र चेहरा दिसला नि मग त्याच्या जागी अम्माचा चेहरा. मधेच रामसिंग दिसला. तोच तिच्या हाताला ओढ बसली. कोण हे आपल्याला मागे ओढतंय् असं वाटलं. ही अम्मा परत का बोलवतेय् का हा रामसिंग? झोपेतच तिने ओरडायला सुरवात केली.

'छोडो रे. हमको जानेका है. रामसिंग गॉडका वास्ते हमको छोडो. रामसिंग रामसिंग. .'

तिची झोपेतली हांक जरा जोरात आली असावी. गेटजवळचा वॉचमन खिडकीखाली येऊन कानोसा घेत होता. त्याने जोरात हांकाही मारल्या.'आंटी , क्या हुआ आंटी? डरो मत. हम है ना.'

आत परत सामसूम ऐकून त्याला शंका आली. त्याने परत कानोसा घेतला. आत एकदम शांतता. आत्ता तर आंटी हांका मारत होती नि एकदम शांत झाली. तो थोडा वेळ थांबला. पण त्याला रहावेना. त्याने गॅरेजमधे जाऊन रामसिंगला उठवलं.

'अरे भैय्या वो आंटी तुमको बुलाती थी लेकीन एकदम शांत हो गई.'

'क्या हुआ आंटीको?'

'तुमही चलकर देखो तो अच्छा होगा.'

रामसिंग मग टॉर्च घेऊन खिडकीत चढला नि आत टॉर्च मारून पाहयलं तर आंटी शांत झोपल्यासारखी दिसत होती. पण एका हातात रोझरी नि दुसऱ्यात कसला कपडयाचा बोळा. शंका नको म्हणून त्याने हांक मारून पाहयलं. पण उत्तर नाही. बहुतेक झोप लागली असेल. आता रात्रीच्या वेळी कशाला म्हातारीला उठवायचं म्हणून तो परतला. तरी त्याला झोप कांही येई ना. . . . .

सकाळच्या अंधुक उजेडात मग तो परत खिडकीशी आला नि आत पाहयलं तर आंटी तशाच अवस्थेत. क्षणभर अभद्र विचाराने त्याचं काळीज हललं. तो तसाच खाली उतरला.

काय करावं की थोडा वेळ वाट पहावी. आंटीला बरं नसेल एखादवेळी. तो दुसऱ्या वॉचमनला बोलावणार एवढयात इरफान दुधासाठी खाली आलेला दिसला. तो धावतच त्याच्याकडे गेला.

'इरफानभाई , आंटीको कुछ हो गया दिखता. कल रातको वो चिल्लाई थी. शायद मेरेको बुला रही थी. देखा तो सोई है समझके मै लौट गया. लेकिन अबभी वो वैसेच सोयी है जैसे मैने रातको देखा था.'

'कैसे देखा था तुमने?'

'एक हाथमे वो माला और दुसरेमे कुछ कपडा था. अबभी वैसेच है.'

'चलो देखते है.' म्हणत इरफान त्याच्या सोबत आला. त्याची अभद्र शंका खोटी ठरावी असं मनाशी म्हणत तो खिडकीवर चढला. आत उजेड पसरला होता.

त्याला दिसलं की तिच्या उजव्या हातात रोझरी नि डाव्या हातात खरंच कांहीतरी कपडा.

तो लगबगीने खाली उतरला नि घरी जायला वळला तोच समोर रशीद. त्याला कांहीतरी सांगत असताना रामसिंगने ऐकलं नि आपली शंका खरी ठरणार म्हणून तो आधीच रडवेला झाला. इरफानने मग वरून डुप्लिकेट चावी आणली. अम्माजवळ होतीच.

वळसा घालून उजव्या बाजूने तिच्या दरवाजाशी आला नि दार उघडलं. पाठोपाठ रशीद नि रामसिंग दोघेही खोलीत घुसले.

रोझालिनचं शरिर थंड पडलं होतं ! श्वास थांबला होता. रात्रीच केव्हांतरी म्हणजे रामसिंग म्हणतोय तसं तिने हांका मारल्या तेव्हांच हे घडलं होतं. एव्हाना वर अम्मालाही कळलं होतंच. तीही हळूहळू चालत खाली आली. आत जाऊन मुलाच्या चेहऱ्याकडे बघताच समजली.

पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिच्या दोन्ही हातात दोन वस्तू. उजव्या हातात रोझरी नि डाव्यात . . . . . अम्माने दिलेला फ्रॉक ! ती बहुतेक ठरवूनच गेल्यासारखी गेली. अम्माचेही डोळे मग भरून आले.

'अम्मा, ऑखिर वो बोला वो सच किया.'

'क्या बोला था वो?' रशीदने विचारलं.

'वहीच. हम नया डरेस पेनके गॉडके पास जाएगा.' रामसिंगलाही मग हुंदका आला.

अम्माने मग त्याच्या पाठीवर थोपटलं .

थोडा वेळ सगळेच सुन्न झाल्यासारखे झाले होते. पण मग त्याना भान आलं. आधी बिचारा रामसिंगच बोलला.

'मेरेको वो रेगोसाबको जाके बताना पडेगा. वो चर्चमे फादरको बोलेगा.'

'चलो फिर. मैभी आता हूँ तुम्हारे साथ. किधर जाना है.' असं म्हणत दोघे बाहेर पडले.

एव्हाना अम्माही भानावर आली. तिनेही मग इरफानला वर पाठवून सुनेला बोलावून घेतलं.

'तू उप्पर जाके बच्चोंकी स्कूलकी तय्यारी कर और झायराको नीचे भेज दे. अब्बीच इसके कपडे बदली करने पडेंगे. और सुन. वो गिलासकी बत्ती है वोभी भेज देना. वोभी रोशन करनी पडेगी.'

इरफान मग वर गेला नि दार लावून अम्मा तयारीला लागली. फादर येण्यापूर्वीच रोझालिनला तयार करायला हवं ! तिला एकदम मोठीच जबाबदारी आल्यासारखं वाटायला लागल. सून खाली आल्यावर मग दोघीनी रोझालिनला तयार केलं. तिचे फेंगडे पाय अडत होते. तरी त्यानी कपडे बदलून नि तिचे हातापायाचे अंगठे जुळवून बांधले. तिची रोझरी तिच्या हातात दिली. ग्लासात वात लावून तिच्या उशाशी ठेवली. माहितगार माणसांसारखी सगळी तयारी केली नि सुनेला वर पाठवून मग अम्मा तिथेच बसून रहायली.

थोडया वेळाने डोनाल्ड ,फादर नि पेरिश ऑफिसचा एक सोशल वर्कर ह्याना घेऊन आला. अम्माने केलेली तयारी पाहून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसलं. त्याना पहाताच डोळे पुसत अम्मा उठून उभी राहयली. पाठोपाठ रशीद नि रामसिंग आत आले. त्या सगळयांचं कांही बोलणं झालं नि दुपारनंतर शेवटची प्रार्थना करून निघायचं नि वरळीला जायचं असं ठरलं. ती माणसं तिकडची व्यवस्था करणार होती. मधल्या वेळात विल्फीला कॉन्टॅक्ट करून बघायचं.

आणखी थोडया वेळाने रशीद नि दुसरा एक माणूस बर्फाने भरलेले टब घेऊन आले.

ते तिच्या खाटेखाली सरकवले. तिच्या देहावर थोडं कोलन शिंपडलं.

सुन्न झालेली अम्मा सगळं मुकाट पहात होती !

एवढं होईपर्यंत अकरा वाजून गेले. म्हणून मग रशीदने अम्माला जबरदस्तीने घरी पाठवलं. दोन घास खाण्यासाठी. तिला जेवण जाणं शक्यच नव्हतं नि वर चैनही पडेना.

बिचारी सारखी वरून डोकावत होती. शेवटी न रहावून तासाभरातच खाली आली नि रोझालिनच्या देहाजवळ मोडक्या खुर्चीत बसून रहायली. तिला उमाळे अनावर होत होते तरी.

विल्फीचा पत्ता नव्हताच. ठरल्याप्रमाणे दोन वाजता फादर नि चर्चशी संबधित आणि रोझालिनला ओळखणारी कांही माणसं आली. डोनाल्ड नि ॲनीही आली. सगळयानी शेवटची प्रार्थना केली. अम्माही डोक्यावर पदर घेऊन उठून उभी रहायली. बाहेर इतर मंडळीही होतीच. रोझालिनचा देह मग चर्चच्या कॉफिनमधे विसावला. फादरने नि डोनाल्डने त्याच्या शेजारी फुलांचा क्रॉस नि चक्र ठेवलं. आलेल्या माणसानी मग कॉफिन उचलून बाहेर उभ्या असलेल्या हर्समधे ठेवलं नि रोझालिनची अंत्ययात्रा निघाली. नाक्यापर्यंत सगळे पायी चालत गेले.

रोझालिन शेवटच्या प्रवासाला निघाली हया कल्पनेनी सगळयाना भरून आलं. खिडकीच्या ग्रीलजवळ उभं राहून अम्मा नि

जमलेल्या आयाबाया हुंदके देत ते दृष्य पहात होत्या. शाळेतून परतणारी मुलंही मग थांबून पहायला लागली. त्या सगळयांची आंटी निघाली होती. मनोमन सगळे तिला गुडबाय करत होते. नाक्यावर वळेपर्यंत हे सर्व ती सगळीजणं पहात होती.

वळणावर मग सगळे आपापल्या गाडयात नाहीतर इरफानने आणलेल्या बसमधे बसले. हा गलबला ऐकून नुकताच धंदा सुरू केलेल्या पॉपकॉर्नवाल्या आंधळयाने कुणाला तरी विचारलं.'क्या हुआ भाई? किसीका मयत हुआ क्या?'

'हां भाई , वो आंटी गुजर गई.'

'अल्लाह . .' नकळत त्याचाही हात कपाळाकडे गेला. . . . . . .

रोझालिनला मूठमाती देऊन सगळे परतले त्यात फादरही इरफानच्या गाडीतून परत आले. तोपर्यंत अम्मा बसून होती.

'अम्मा आपको थॅन्क्स् बोलनेके वास्ते हम वापिस आया. तुम लोग रोझालिनको बहोत सपोर्ट किया. लेकिन एक काम अभी बाकी है.'

सगळे प्रश्नार्थक नजरेने फादरकडे पहायला लागले.

'रोझालिन हमको सब बताया. सब लिखके पेपर हमारा पास छोडा है. इसवास्ते उसने हमको एक काम बोला है. अभी घर बंद नही कर सकता. लेकिन ये रामसिंग उसका ख्याल रखेगा.'

हळू हळू सगळे जायला निघाले तेव्हां अम्माही निघाली. तिला वाटलं आता फादर बोलल्याप्रमाणे रामसिंग घर उघडं ठेवील नि बघेल. पण फादरने तिला थांबवलं. बाहेर आल्यावर त्याने दरवाजाला कुलूप घातलं नि शेजारी उभ्या असलेल्या अम्माकडे वळून सांगितलं.'अभी आपकोही ये देखना है की रामसिंग इधर रहेगा. आपका लडकेकू हम समझाया है. सोसायटीका पास हम पेपर भेजेगा.'

सगळे अचंब्याने बघतच रहायले. रोझालिनने असं कांही ठरवलं असेल असं कुणाच्या लक्षातच आलं नव्हतं.

इतक्यात कुठूनसा अचानक विल्फी उगवला. फ्यूनरलला तर तो नव्हता. मग आता कशाला आलाय् म्हणून सगळे बघायला लागले. त्याने फादरकडे मोहरा वळवला तेव्हां फादरने शांतपणे विल्फीकडे बघतच चावी रामसिंगच्या हातात दिली नि सांगितलं.

'रामसिंग अब तुम इधर रहेगा. रोझालिन हमको बोलके गया है.'

'हाऊ कॅन इट बी फादर?'

'येस् माय डिअर. रामसिंग इज हर ट्रू सन. नॉट यू. आय मीन इट.'

पाठ वळवून चालताना फादरने पुन्हा एकदा वळून विल्फीला सांगितलं.

'ॲन्ड डोन्ट एव्हर ट्राय टू कम हिअर अगेन. ऑर एल्स् . . . .'

वाक्य अर्ध्यावर सोडून फादर निघाला तेव्हां सगळे भारावून बघतच रहायले. त्याना कांही प्रतिक्रिया व्यक्त करताच येईना. रामसिंगने वळून अम्माकडे पहायलं. त्याचे डोळे वहात होते

तसेच अम्माचेही. पण तिच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होतं. कितीतरी वेळ अम्मा त्याच्या पाठीवर हात फिरवत रहायली. सगळे पांगले तरी. . .

विल्फी तणतणत निघून गेला. . . . . . .

आता फळीवर जीजस नि मेरीच्या शेजारी रामसिंगचा कन्हैया आला; कसलीही धर्मबंधनं न पाळता. नि रामसिंग दिवाळीबरोबरच ख्रिसमसही साजरा करायला लागला, रोझालिनच्या फोटोला हार घालून ! नि आठवणीने हया मानलेल्या आईच्या तिथीला ग्रेवयार्डमधे जाऊन फुलं ठेवून !

***

.. काळा घोडा ..

जुने मुंबईकर अजूनही त्या परिसराला काळा घोडा म्हणूनच संबोधतात. दरवर्षी तिथे वाहतूक अडवून होणारा तरूणाईचा उत्सवही काळाघोडा फेस्टिवल म्हणूनच ओळखला जातो. वास्तविक वाहतूकीला अडथळा नको म्हणूनच बहुदा तिथला राजा आपल्या घोड्यासह राणीला भेटायला गेला! आता तिथेच काय त्या परिसरात कुठेच घोडा दिसणं शक्य नाही.

अशा रहदारीच्या ठिकाणी कुणाची वाट पहात थांबण्याची एकच जागा म्हणजे आर्ट गॅलरी. वास्तविक तिथेच मला घेऊन जायसाठी रामप्रसाद भेटायला येणार होता. आतलं कसलंसं प्रदर्शन बघायला. मला ज्यातलं ओ की ठो कळत नाही असा विषय. शिवाय साधारण नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गी यांची पोहोच अशा सॉफिस्टिकेटेड विषयापर्यंत असण्याचं कांही कारणच नाही.

कांही वर्ष एकत्र काम करण्यामुळे निर्माण झालेली थोडीफार फ्रेन्डशिप. म्हणजे माझ्या बाजूने. पण तो मात्र माझ्याबद्दल प्रचंड रिस्पेक्ट वगैरे बाळगून असावा. बहुतेक वयामुळे असेल. मी त्याच्याहून दहा वर्षानी मोठा. म्हणजे पंचेचाळीसच्या पुढे नि तो आत्ताशी पस्तिशी गांठतोय. शिवाय दुसऱ्या ब्रॅन्चला गेला तरीही संबंध ठेवून आहे. म्हणजे मलाही तसं एकदम

झटकून टाकणं शक्य नाही. त्याच्या सांगण्यावरून बघूया काय असतं ते म्हणून आलो.

'हाय.' पाठीमागून आवाज आला म्हणून वळलो.

'इकडून कुठून आलास? मी इकडे समोर बघतोय.'

'पाठीमागच्या बसस्टॉपला. बॅलॅर्डपिअरवरून आलो ना. बराच वेळ झाला तुला?'

'झाला थोडा वेळ. पण तू सिग्रेट . .' मी वाक्य अर्ध्यावर सोडलं. पूर्वी पाहयलं नव्हतं.

'स्टॉपला उतरल्यावर घेतली. लगेच टाकायची जिवावर आलं. खरंतर तुझ्यासमोर ओढत नाही म्हणून तुला माहित नव्हतं.'

हा पठ्या मला रिस्पेक्ट म्हणून माझ्यासमोर ओढत नसला तरी ओढत होताच. एरव्ही मात्र माझ्या खांद्यावर हात ठेवून अरे तुरे करत होता नि पोरींचे जोक सांगत होता!!

त्याच्या एकूणच व्यक्तिमत्वाला अनेक कंगोरे होते. कधी कधी तर आकलन न होणारेही. आणि सगळयाच क्षेत्रात इन्टरेस्टही. एक सोडून. लग्न हा विषय बहुदा त्याला वर्ज्य असावा. आता पस्तिशी जवळ आल्यावरही लग्नाचा विषय उडवूनच लावतो. तशा मैत्रिणी असाव्यात. पण सगळया बाहेरच्या. म्हणजे परेरा किंवा बाटलीवाला नाहीतर चोप्रा वगैरे. म्हणजे त्याच्या व्यक्तिमत्वाला आणि रहाणीलाही साजेशा. स्टाफपेक्षा त्याची घसट अशाच सेक्रेटरी वगैरेंशी जरा जास्तच. ऑफिसमधल्या बहुतेक जणी त्याला काकूबाई वाटत असाव्यात. त्याची लाईफस्टाईल त्याच्या एजग्रूपला साजेशी असली तरी जरा जास्तच मॉडर्नवाटत होती. प्यायचा वगैरे. पण कधी मधी. पण एरवी वावर मात्र हायफाय सोसायटीत. तिथे बहुतेक त्याचं इंप्रेशन पडत असावं.

'चल. जाऊया ना. आणि तू एवढा वेळ पब्लिक बघत फुकट कशाला घालवलास? आत जाऊन बघायला सुरवात करायचीस ना.' हातातली संपलेली सिग्रेट टाकून म्हणाला.

'तू आल्याशिवाय मला काय धोंडे कळणार.' माझी टिपिकल पांढरपेशी प्रतिक्रिया.

'बघितलं की समजतं रे. चल.'

आत फिरताना थंड वाटत होतं. पेन्टिंगपेक्षा भोवतालचं पब्लिक बघण्यातच माझा इन्टरेस्ट अधिक. मला माणसं निरखायाला आवडतं. तऱ्हेतऱ्हेची माणसं ! इथेच किती तऱ्हा पहायला मिळाल्या. कांही सोकॉल्ड उच्चभ्रू ,विशेषतः बायका उगाच आपल्या फॅशनचंच प्रदर्शन करायला आलेल्या दिसत होत्या. कांही रसिक नि कलावंत (?) आपल्या खांद्यावरच्या झोळया , कुडते नि दाढया मिरवत होते. हातातला कॅटलॉग बघत शोऑफ करत होते. कांहींच्या चेहऱ्यावर तिथल्या चित्रातल्यासारखंच अबोध स्मित तरळताना दिसत होतं.

मधेच लिपस्टिकवाल्या ओठांचे चंबू चित्कारत होते.'हाऊ ब्यूटिफुल..' वगैरे वगैरे.

....

'अरे तिकडे कुठे पहातोयस. इकडे फ्रेममधली पेन्टिंग बघ. ती चित्रं तुला नंतरही दिसतीलच रस्त्याने जाताना.'

'तू समजाऊन सांगशील कां हे काय अमूर्त कि काय म्हणतात त्याचा अर्थ. माझ्यातर डोक्यात कांही शिरणं शक्य नाही.'

खरंच समजत नव्हतं. एका चित्रात एक पाय नि त्याच्यावर एकदम एक डोळाच. दुसऱ्यात स्त्रीचे स्तन जणू तिच्या डोक्यालाच चिकटलेले.

कांही भूमितीच्या एकमेकात मिसळलेल्या आकृत्या. त्यात पुन्हा भडक रंगांची सरमिसळ. बापरे. हयाला आर्ट म्हणतात नि त्याच्या प्रदर्शनासाठी एवढया मोठया गॅलेऱ्या. हुसेनचे घोडे ठीक पण ती सरस्वतीची प्रतिमा?

असल्या चित्राना म्हणे लाखोनी किंमत मिळते. संग्राहक ती हौशीनी घेतात. प्रतिष्ठेचं लक्षण म्हणून.

दसऱ्याला पाटीवर आकडयांची मोरपिसारखी सरस्वती काढणं एवढीच आमची चित्रकला. बाकी आनंदच. चाळीतल्या दोन खोल्यात पूजेची सरस्वती होती. पुढे चाळकरी'मारवाडयांच्या' कृपेनी डोंबिवलीकर ब्लॉकवाले झाले तेव्हां फारतर एकाच लाकडी फ्रेमला फाउन्टनला रस्त्यावर मिळणारी चित्र बदलून लावण्याएवढाच बदल. एरवी मानसिकता तीच. त्यामुळे हा अर्थ हीन भपका नको वाटायला लागला. त्यापेक्षा मघा रस्त्यावर स्केचेस काढणारा बरी चित्र काढत होता. शिकाऊ असावा बहुतेक. रामप्रसादला तरी काय कळत होतं कुणास ठाऊक. कां तोही उगाच शोऑफ करत होता. भराभरा पुढे सरकणारा बहुदा मीच एकमेव प्रेक्षक असेन. एवढयात हॉलमधे शिरणारी मारिआ दिसली नि सगळा उलगडा झाला.

हे रामप्रसादचं कुलाब्याला रहाणारं एक पात्र नि भेटीसाठी हे त्यांचं ठरलेलं संकेतस्थळ. मग मला कशाला फोन करून बोलवलंन् मला कळेना. मग लक्षात आलं. त्याचा बहुतेक दुहेरी प्लॅन असावा. जमलं तर मारिआला भेटायचं. नाहीच जमलं तर माझ्या पैशानी बिअर पिऊन माझा पोपट करायचा त्याचा बेत असावा. काळा घोडा झिंदाबाद नि काय !

तसा त्याने पूर्वीही एकदा माझा पोपट केलेला पण तेव्हां माझ्या लक्षात यायला वेळ लागला. माझ्याकडून एका इंग्रजी सिनेमाचं नांव सांगून दोन तिकिटांचे पैसे घेऊन गेला नि तिकिट मिळालं नाही सांगून माझ्याच कॉस्टवर असाच कुणा पोरीला नेऊन सिनेमा बघितला. स्वतःला तोशीस न पडू देता ! नंतर सावकाश पैसे दिलेन. पण त्याच्यावर रागावताही येत नव्हतं.

तसा लबाड नव्हता. गुलछबू मात्र होता. जमेल तेवढी एन्जॉयमेन्ट हेच बहुतेक त्याचं जीवनसूत्र असावं. पण ही बया मलाही ओळखत होती. म्हणजे तोंडदेखलं बोलणं आलंच.

मी आधी रामचा शर्ट ओढला. मी आधी बोलण्याचा आगाऊपणा केला असं त्याला वाटू नये म्हणून. त्याला ते अपेक्षित होतं बहुतेक किंवा समोरच्या कुठल्यातरी कांचेत ती दिसली असावी. तो अलगद मागे वळणार त्याआधीच मी तिला हात केला होता.

कुठल्यातरी परफ्यूमचा वास जवळ आला. ती एकदम वेलड्रेस्ड दिसत होती. वाढल्या वयाची असूनही तशी टवटवीत दिसत होती. होतीही तशी टंचच नि रहाणी ही अशी. . .

सॉफिस्टिकेटेड.

'हाय जन्टलमेन . .' मला बघून असेल. स्वतःबद्दल एक गोड गैरसमज. वाटलं खरंच मी दिसतो कां जन्टलमन.

कदाचित् ती'हाय स्वीटहार्ट' असं म्हणायच्या तयारीने आलेली असणार. राम्यालाच फक्त. पण मी उगाच मधे कडमडेन हे तिला अपेक्षित नसावं.

'व्हाय सो लेट?' रामप्रसादचा प्रश्न ऐकून खात्रीच झाली. हयांचा आधीच प्रोग्राम ठरला असणार. पुढे कुलाब्यालाच रहाते म्हणे. हे अर्थात् राम केव्हांतरी बोललेला.

आता आपण पळ काढायच्या तयारीत असलेलं बरं. कायतरी कारण शोधावं अशा विचारात असतानाच रामने माझा खांदा दाबला नि माझ्याकडे बघून डोळा मारला. हे सारंतो इतक्या बेमालूमपणे नि झट्कन् करी की दुसऱ्याला समजू नये. तो अशावेळी आमच्या वयातलं अंतरबिंतर विसरून जायचा !

'चलो जाएंगे?'

'कुठे?'

'तुला माहितेय्. आपण दोघं कुठे जाणार? बारमधे.'

'आणि हे तुझं प्रकरण?' तिला ऐकू येणार नाही अशा बेताने मी विचारलं.

'हे पार्सल घरी सोडून पुढे जाऊ.'

'मग माला कशाला बोलावला?' तिने ऐकलं बहुतेक. मारिआ मराठी बरं बोलायची.

'अरे यार. टू गिव्ह अस कंपनी फॉर समटाईम. देन वुई विल ड्रॉप यू डिअर.' ृाम भलताच मूडमधे दिसत होता.

'देन गो टू लेडिज बार. यू विल गेट कंपनी देअर.'

प्रदर्शन बाजूलाच राहयलं. आता हयांचीच जुगलबंदी ऐकावी लागणार बहुतेक.

'राम यू कॅरी ऑन. मी निघतो.'

'थांब ना यार. आज जरा भटकू या. खूप दिवसानी भेटतोय्.'

'मी पण खूप दिवसानी भेटतेय् तुला.' मारिआ. तिचंही बरोबरच होतं. आता ती दुसऱ्याच ऑफिसात होती.

'देन आय हॅव डिफरन्ट आयडिया. वुई विल गो टू यूअर हाऊस. तुझ्याकडेपण चांगला स्टफ असेलच ना.' ही बहुतेक हयाची फुकटेगिरीची लाईन असेल असं वाटून मी म्हटलं'नको यार. मी निघतो. यू कॅन एन्जॉय.'

'नॉट अ बॅड आयडिया रिअली. पण आता ममा थकलीय नि आजारीसुद्धा असते. तेव्हां. .'

'नो लिकर बिझनेस. . आय नो इट. तिने पूर्वीच स्टॉप केलाय् ना गुत्ता. सो व्हॉट.

युई विल बाय ऑन द वे. तिलाही बरेच दिवसात भेटलो नाही.' हे त्याचं इमोशनल ब्लॅक मेलिंग असावं. मारिआ तयार झाली पण मला जावंसं वाटेना. त्याने बाहेर येऊन समोरच्या बाजूची टॅक्सी बोलावली. लायनगेटला वळसा घालून रिगलवरून कुलाब्याकडे. किती झटकन् निर्णय घेतो हा माणूस. . . . .

. . . . टॅक्सी जेव्हां कुलाबा मार्केटच्या बाहेर पास्तालेनसमोर उभी राहयली तेव्हां मला जरा विचित्र वाटलं. कारण हा भाग परिचयाचा होता. कुठे घेऊन जाणारेय् हा माणूस कुणास ठाऊक. कारण गुत्ता म्हटल्यावर उजवीकडे वळून पास्तालेन मधे शिरताना नाक्यावरची बिल्डिंग सोडल्यावर पुढे एक बैठी चाळ होती पूर्वी ; ते आठवलं. दोन चांगल्या बिल्डिंगच्या मधल्या बेळक्यात होती. दोन गाळयापैकी एकात निरंजन हॉटेल. म्हणजे पूर्वी नुकताच सुरू झालेला वडापाव नि मिसळ. वर चहा. एवढयापुरतंच होतं ते हॉटेल. दुसऱ्यात आंटी वाझचं तेव्हां केवळ पोलिसाना दाखवण्यापुरतं कॉन्फेक्शनरीचं दुकान. नि मागे गुत्ता. तिथून जिना चढल्यावर जी रिकामी जागा लाकडी कठडा लावून अर्धीच बंद केलेली होती तिथे स्वतः आंटी महाराणीच्या रूबाबात बसायची. खास गिऱ्हाईकांच्या सरबराईसाठी. त्यात खालच्या निरंजनचा सदाण्णा नि समोरच्या बाजारातले तेव्हांचे प्रतिष्ठित दुकानदारही असायचे. आतल्या खोलीत आंटीची मेड चाकण्याची तयारी करायची. तिची फॅमिली तिने गोव्यालाच ठेवली होती. नवऱ्याजवळ ! म्हणजे इथे रेड आली तर ही बाई केव्हांही उठून पोलिसांच्या गाडीत बसायला तयार. हा सगळा पंचवीस वर्षांपूर्वीचा इतिहास आठवला. .

.. बघतो तर बाहेरच्या दुकानातून एक हाफ घेऊन हा माणूस तिकडेच वळला. मारिआ पुढेच गेलेली. आत शिरताक्षणी जाणवलं कि

निरंजन हॉटेलच्या जागी राजस्थानी भट चहाचं दुकान चालवित होता. नि त्या गांवठी कॉन्फेक्शनरीच्या जागी मोठया शोकेसवालं केकशॉप.

माझी पावलं रेंगाळली तशा माझ्याकडे वळून रामने प्रश्नार्थक चेहरा केला.

'मी पूर्वी इथे आलोय.' चुकून शब्द गेले. कारण डोळयांपुढे पंचवीस वर्षांपूर्वीचा काळ झटकन् येऊन गेला. रामप्रसाद बघतच राहयला. हा म्हातारा इथे कशाला तडमडला असेल असं वाटून त्याने भुवया उंचावल्या.

'नाही म्हणजे तसं वाटतंय. कांहीतरी परिचयाचं असल्यासारखं.' उगाच सांवरून घेतलं. खरं तर मला सगळं आठवत होतं !! कदाचित् ही मारिआ वाझ आंटीचीच मुलगी असेल असंही वाटून गेलं. कारण रस्ता क्रॉस करताना तिला पुढे त्याच केकशॉपच्या बाजूला वळताना पाहिलं होतं. पूर्वीच्या ह्या बदनाम मोहल्ल्यात हा प्राणी कशासाठी येत असावा. फक्त गुत्त्यावरच किंवा हया मारिआसाठीही असेल....

पास्तालेन म्हणजे गल्लीपेक्षा जरा मोठा रस्ता. समोरासमोरच्या बिल्डिंगमधली लोकं बाल्कनीतून एकमेकांशी गप्पा मारू शकतील इतकाच रूंद. लेनच्या डावीकडे वळून बघितलं तर ती जुनी सोसायटी तशीच होती. पण रस्त्याच्या बाजूला असलेली बँकेची शाखा नव्हती. तिथे होतं ते एक अलिशान डिपार्टमेन्ट स्टोअर. अगदी आतल्या बाजूला असलेल्या बिल्डिंगच्या एन्ट्रन्सपर्यंत. पाठीमागच्या बाजूला ऑफिसमधे कन्व्हर्ट केलेल्या जुन्या गॅरेजचं शटर खाली ओढलेलं दिसलं. कधीकाळी आपण इथे काम करत होतो ते आठवलं नि मग सगळे जुने तपशील तपासून बघण्याचा चाळाच लागला. नजर वर गेली. जिथे आमचं ऑफिस होतं त्या फ्लॅटमधे चक्क एक फॅमिली रहात होती. बाल्कनीत कपडे वाळत होते.

मग नजर गेली ती समोरच्या फ्लॅटकडे. कधीकाळी तिथे चालणाऱ्या धंदेवाईक हालचाली , त्या वयातलं कुतूहल म्हणून चोरून न्याहळण्याचा एक चाळा मधून मधून सुरू असायचा. त्यातला आमचा वाटाडया

होता मखिजा. थोडा मोठाड त्यामुळे अनुभवी ! पण खरा गुरू होता शिवरामन्. समोरच्या फ्लॅटमधल्या गुल पंजाबीशी त्याची विशेष घसट. तोही बहुतेक तिच्या चाहत्यांपैकी एक असावा किंवा सुटीच्या दिवशी जातयेत असावा. आमच्यातला सिनियर. जवळपास पस्तिशी उलटलेला कुटुंबवत्सल वाटावा असा.

पण गुलची खरी ओळख आम्हाला समजावून सांगणारा तो मखिजाच. शिवाय शहा नांवाचं खेतवाडीत रहाणारं अतरंग कार्टही होतंच थोडीफार माहिती पुरवायला. कारण त्या गुलची धाकटी बहिण सोना तिकडे खेतवाडीत कुणा शेटजवळ रहायली होती. मात्र गुलची फॅमिली इथे कधी दिसली नव्हती. होती ती तिची सर्व्हन्ट. केव्हांतरी एक माणूस लहान मुलीला घेऊन भेटून जायचा. तोच ह्या शिवरामनशीही समोरून बोलायचा. तेव्हां कळलं कि तो गुलचा नवरा. राम पंजाबी. मुलीला घेऊन कल्याण कि उल्हासनगरला रहायचा. आपल्या कुटुंबाबरोबर. पण भेटून मात्र जायचा. कदाचित् पैसे न्यायला येत असावा. कारण रहायचा मात्र कधीच नाही.

फक्त एकदाच आम्ही त्याला रहायला आलेला बघितला. समोर गुलच्या फ्लॅटमधे पूजा होती. सत्यनारायणाची. तेव्हां बाल्कनीला लाईट वगैर लावताना दिसला. विशेष म्हणजे आम्हा समोरच्या ऑफिसमधल्या सगळयाना प्रसाद घ्यायसाठी आमंत्रण होतं. आमचंही कुतूहल शमवण्याची ती संधीच होती. आम्ही चौघंजणं गेलो होतो. शहा , मखिजा, मी नि शिवरामन्. त्यातला शिवरामन् आमचा हेडक्लार्क म्हणून म्होरक्याही. फक्त खेडेकर साहेब सिच्युएशन टाळायसाठी लवकर निघून हेड ऑफिसला गेले.

कुलवंताच्या लेकीसुनांसारखी सजलेली गूल पाह्यली नि मनात आलं रोज जिला अस्ताव्यस्त कपडयात बाल्कनीत उभी असलेली पहातो ती हिच कां? राम पंजाबीही खूष दिसत होता. म्हणजे सगळं कसं एकमेकांच्या संमतीने चाललं होतं. फक्त इथे सीतेऐवजी राम वनवासी होता. का सीतेवरच हा वेगळा वनवास लादला होता? त्यानाच ठाऊक ! ..

हे सगळं आठवत वेंधळयासारखा इकडेतिकडे पहात चाललो होतो. रामप्रसाद पुढे जाऊन केकशॉपच्या शोकेसमधून बहुतेक मलाच पहात होता. मी जवळ आल्याशिवाय त्याला आत जाता येत नसावं. नक्कीच हे लोकं आंटी वाझकडेच जात असावेत. म्हणजे मारिआ तिचीच मुलगी तर.. पण ती तर मिस् डिसोझा असं नांव लावते. कुणीतरी नातलग असेल.

'कुठे कुठे बघत बसलायस्. मला सांग, तू खरंच हया बदनाम गल्लीत कधी आला होतास कां पूर्वी?' नाकपुडीवर तर्जनी आपटीत रामप्रसाद म्हणाला.

सांगावं कि नाही हयाचा निर्णय होत नव्हता. कांही तरी बोलायचं म्हणून नि त्याचा संकेत समजून मी बोललो.

'आपल्या बापाच्यान् असलं काम व्हायचं नाय्.'

'पण .... पण माझ्या बापाच्यान् झालंय केव्हांतरी.'

'तू खरंच आपल्या बापजाद्याची मालमत्ता असल्यासारखा सराईतपणे येतोयस् इथे.'

'मालमत्ता नाही पण माझ्या बापाचं घर होतं इथे. दुसरं घर. तू आत्ता वर पहात होतास

तेच. आता बंद असतं.' मनात म्हटलं हयाचा बाप कोण माहित नाही. येत असेल कदााचित् त्याच गुलबकावलीकडे. तिच्या नेहमीच्या दोस्तमंडळींपैकीच असेल. बघितलाही असेल तेव्हां. तो यंग असेल तर. त्या गॅरेजच्या दरवाजात गाडी पार्क करून कित्येकजण थोडा वेळ दुपारच्या नाश्त्यासाठी येत असत. हा शब्द मखिजाचा. असं कांही ऐकलं कि शिवरामन् गरम व्हायचा.

त्या चुरगळलेल्या कपडयानी नि विस्कटलेल्या केसानी गाडीत येऊन बसणाऱ्यांमधलाच एक खरंच हयाचा बाप असेल? असेलसुद्धा.

'हे तुला कसं माहित पण? तू नक्की बापाबद्दलच बोलतोय्स ना?'

'हो यार. आणि हेही मला बापानेच सांगितलं. पूर्वीच.'

माझी बोलतीच बंद झाली. हया प्राण्याचा बापही तसाच असला पाहिजे. विक्षिप्त!

'माझी नवी नोकरी. मारिआशी नुकतीच ओळख झालेली. नंतर मी जेव्हां बापाला सांगितलं कि माझी मैत्रिण आहे पास्तालेनमधे तेव्हां तोच बोलला कि त्याचीपण होती एक. गुल पंजाबी.'

'पण मग इथेच आणि तीच कशावरून? म्हणजे त्याच जागी?' माझी विचित्रच रिॲक्शन. तो तर सरळ नांवच सांगत होता की !

'दुसरी कोणी गुल पंजाबी नाय इथे. अरे मी तेव्हांच गंमतीने मरिआला बोललो ना माझी स्टेपमदर आहे इथे तर तिने आंटीला सांगितलं मग आंटीने हळूहळू आठवेल तसा तपशील पुरवला. तेव्हां गुल होती इथेच पण मला कधी दिसली नाही. त्यावेळी आंटीचा धंदा जोरात होता. म्हणून आम्ही जास्त करून बाहेरच भेटायचो.'

खरंच अजब वल्ली होती राम म्हणजे ! नि त्याचा बापही तसाच. अजबच.

केकशॉपच्या बाजूने आत जिन्याकडे शिरताना रामने वर बघितलं तर मारिआ उभीच होती. त्याच अर्ध्या उघडया माडीवर. जिथे पूर्वी आंटीच्या खास माणसांची लाईन लागायची.

हळदीकुंकवाच्या सवाष्णींसारखी. हा खास शब्द खेडकर साहेबांचा. वरच्या ऑफिसमधले आमचे ऑफिस सुपरिन्टेन्डन्ट. ते ब्राम्हण होते. आवडत नव्हतं तरी कधी कधी आमच्यावर नजर ठेवण्याच्या बहाण्याने बघत. अगदी निरखून.

हयाच माडीवर गल्लीतल्या इतर लोकांकडल्या गोवन मेडना बोलावून आंटीने मुलीच्या लग्नाचा गांवठी समारंभ सुरू केला होता. कारण त्याना गोव्याकडून तिनेच आणून कामाला लावलं होतं. त्या तिच्या मिंध्या होत्या तेव्हां तिच्या सांगण्यावरून हेल काढित कोकणी गाणी म्हणत उखळीत कायतरी कुटत होत्या नि बाजूला खूपशा रंगीत बांगडया घातलेली, गोव्याहून आलेली आंटीची लेक नटून बसलेली. त्यावेळी प्रथमच आन्टीचा नवरा दिसला होता ......

गल्लीत शिरून उजव्या बाजूचा तो अजून तग धरून असलेला डुगडुगता जिना चढलो तो समोरच खास गोवन क्लबात असावेत असे दोन पेटारे समोरासमोर ठेवलेले नि त्यावर कुशन घालून खास पाहुण्यांची आसन व्यवस्था केलेली. इतक्या जवळून मी हे आताच पहात होतो. मधल्या टीपॉयसारख्या स्टुलावर मारिआने सगळा सरंजाम मांडलेला. उजव्या बाजूला दोन पायऱ्या चढल्या की आत बाजूबाजूला दोन खोल्या होत्या. त्यातली एक खालच्या केक शॉपच्या डोक्यावरच रस्त्याकडे खिडकी असलेली.

पूर्वी इथे कोण ना कोणतरी कायम बसलेलं. कुणीच नाही तर खाली तोंडाशी बसून चाकण्याचे तळलेले मासे विकणारी शांती. आंटीच्या सांगण्यावरून वरती येऊन बसलेली. कशाला? तर धाड पडणारच असेल तर आंटीला खबर द्यायला. म्हणजे त्या गॅलरीतल्या टयूबांमधला माल कठडयावर चढून तिचा नोकर किंवा सर्विस बॉय असलेला अंतोन छपरावर भिरकावून द्यायचा नि आंटी वाइझ आपला फ्रॉक नेटका करून खोलीतून पैसे घेऊन यायची. केव्हांही खाली उतरायला तयार असल्यासारखी. पोलिसांच्या गाडीत बसायला. केव्हां केव्हां खालचा सदाण्णा तिच्या मदतीला जायचा पाठोपाठ. चौकीत मांडवली करायला. सातआठ महिन्याच्या तिथल्या नोकरीच्या काळात हे नेहमीच बघावं लागायचं.

हे सारं आठवलं नि समोर दरवाज्याजवळच बसलेल्या आंटीकडे लक्ष गेलं. आता उतरत्या वयामुळे असेल पण साडीत होती. चष्माही होता. वय झालेलं एकूणच तिच्या हालचालींवरून दिसत होतं. माझ्यापुढेच असलेल्या

रामप्रसादकडे बघून ती हंसली. ओळख असणारच. त्या पेटाऱ्यांवर बसता बसता रामने तिची चौकशी सुरू केली. कोकणीमधे!

'बोरी हा मुं?' रामप्रसादला सगळया भाषांमधे इन्टरेस्ट. तिने मान डोलावली.

'तू कसो हा? बऱ्या दिसान् आयलो.' म्हणत म्हणत आंटीने माझ्याकडे पाहयलं.

'आमगेलो फ्रेन्ड. वासू.' मधेच बोलून मारिआने माझी ओळख करून दिली.

मान हलवून हंसत ती आत गेली. आम्हाला बोलता यावं म्हणून असेल बहुतेक.

रामचं ग्लास भरणं चाललं होतं. एक मारिआसाठी वेगळा. फक्त जीनचा.

'कम् ऑन. वासू हॅव इट.' हे खरं तर रामने म्हणायचं ते मारिआच बोलली.

माझा खरंच मूड नव्हता. दोन कारणांसाठी. एक म्हणजे मी त्यांच्यात मिस्‌फिट झालोय् हयाची जाणीव होती. राम सोडत नव्हता म्हणून आलो इतकंच.

दुसरं म्हणजे नको त्या मोहल्ल्यात आल्यामुळे जुन्या आठवणी चाळत होतो. त्यात खरं तर मी डिस्टर्ब व्हावं असं कांही नव्हतं. एकतर माझी कशातच इन्व्हॉल्वमेन्ट नव्हती. नि शिवाय पंचवीसावर वर्ष उलटून गेल्यावर जे आठवत होतं त्यात कुतूहलाचाच भाग जास्त होता. त्यात आणि राम्याने गुलच्या बाबतीत आपल्या बापाचा जो उल्लेख केला तो खटकला होता एवढंच.

मारिआशी गप्पा मारत त्याचं यथासांग पिणं चालू होतं. माझा छोटा पेगच संपायची मारामार. फक्त चाकण्याचे काळे चणे नि शेव कि काय होतं तिथेच हात जात होता. मधेच भिंतीवरचे फोटो बघत होतो. त्यात एक जुना फोटो दिसला. बहुतेक त्यावेळी लग्न झालेल्या मोठया मुलीचा नि जावयाचा फोटो असावा. शेजारी दुसरा बहुतेक मुलाचा असावा. त्यांच्या ऑफिस नि इतर गप्पात व्यत्यय आणत मी सहज विचारावं तसं विचारलं.

'हू इज धिस मारिआ?'

'दॅटस् माय एल्डर कझिन. ॲन्ड द अदर वन इज हर ब्रदर.'

'आन्टीज् चिल्ड्रन.' राम्या मधेच बोलला.

'व्हेअर आर दे नाऊ?' त्यानेच पुढे तिला विचारलं.

'ती कवाच मायग्रेट झाली कॅनडाला. तो भाव गल्फमधे असतो.'

मारिआ चाकण्याची बशी भरायला आत गेली तेव्हां मी डोळयानी रामला खुणावलं.

अजून मला उलगडा होत नव्हता. ही मारिआ कोण आन्टीची. तिशीची मारिआ आन्टीची मुलगी नक्कीच नसणार. आधी ती आन्टीला ममा म्हणते नि नंतर त्या फोटोतल्याना कझिन म्हणते. माझ्या डोक्यातला गोंधळ रामला कळला बहुतेक.

'अरे, ही मारिआ आन्टिच्या भावाची मुलगी. ती लहान असतानाच बाप गेल्यावर तिच्या आईने रिमॅरेज केलं. म्हणून आन्टीने तिला इथे आणली. त्यामुळे ती आन्टीलाच ममा म्हणते.'

'ओ आय सी.' माझं कुतूहल शमलं !

'आता तर तीच मुलगी झालीय् आन्टीची. ते दोघं कुठे येणार परत.'

'पण तीही जाईलच की केव्हांतरी.' माझी शंका. तीसुद्धा त्याच्याकडे सहेतुकपणे बघत.

'नाय्. मी मॅरेज नाय् करणार. कधाच. तशी ममा म्हणते. बट नो. आय् डोन्ट वॉन्ट टू मिस हर.' मारिआ स्वतःच बाहेर येत बोलली. ह्यावेळी तिने रामकडे अशा नजरेने पाहयलं कि तिच्या म्हणण्यात ठामपणा नसावा असं वाटून गेलं. माझ्या नजरेने त्यांची ही नजरानजर टिपलीय हे बहुतेक त्याना कळलं नसावं.....

आमच्या गप्पा म्हणजे बहुतेक वेळ त्या दोघांच्याच.. चालू असताना मधेच आंटी येऊन बसली. त्याच तिच्या दाराजवळच्या खास खुर्ची वर. रामने परत तिच्याकडे मोर्चा वळवला. घरगुती गप्पांसाठी.

'आंटी तो फ्लॅट आता बंदच असतो का?'

आंटीला समजलं तो गुलची चौकशी करतोय.

'हां रे. आता तर पंजाबीबी नाय येत.'

'या. बिकॉज ही लॉस्ट हिज डॉटर ऑल्सो.' मधेच मारिआ बोलली.

'व्हॉट?' त्याला वाटलं ती मेली. जशी ह्याची सख्खी बहिणच लागत होती !

'म्हंजे तसा नाय रे. ती गुलची भैण होती ना सोना. तिकडे खेतवाडी का कुटे तरी, तिच्या शेटनी सिनेमा काढला गुलच्या मुलीला .. लालीला घेऊन. तो सिनेमा पडला आनि ते लालीबी पडली त्या शेटफुडे.'

बापरे. गोष्ट रंगत जाणार बहुतेक.

'मंग सोना भाअेर पडली. गुल तर म्हातारीच झाली होती. शॉकनी शिक झाली. सोना तिला घेऊन गेली. इथे टाळा मारून. आता राम

पंजाबी कशाला येनार इकडे? बायको तर कधीच सुटी झालेली. आता तर पोरगीही शेटच्यामागे गेली.'

रंजक असली तरी माहिती फारशी चांगली नाही वाटली !

तशी रामप्रसादने बापाची सगळी हकिगत समजून घेतलेली. दोघंही बापलेक ग्रेटच. मला मात्र रामप्रसादच्या पर्सनल अशा गोष्टी फारशा माहितच नव्हत्या.

जेमतेम छोटा पेग संपवून मी रामला म्हटलं.

'मला निघायला पाहिजे राम.'

'निघूया रे. घरी फोन कर ना. पण सेलफोन नसेल तुझ्याकडे. माझ्या सेलवरून कर. सांग लेट होईल.'

'किती वाजतील माहिती आहे कां?'

'बरं चल मीही येतो तुझ्याचबरोबर. बोलत जाऊ. व्हीटीलाच जाणार ना?'

असं म्हणून तो खरंच उठला. चार पेग घेऊनसुद्धा तो सरळ उभा राहू शकत होता. ग्रेट.

'तुझ्याशी बोलायचंय् ते वाटेत बोलू.'आता हयाला आणि काय बोलायचंय तोच जाणे.

बहुतेक त्या गुलबकावलीबद्दलच असेल. उगाच इमोशनल होतोय् असं वाटलं. आंटी आत गेलीच होती. त्याने मारिआचा निरोप घेण्यासाठी शेकहॅन्ड केला. मी पुढे झालो. त्या वाकड्या जिन्यावर धडपडलो म्हणून मागे वळलो तो जिन्याच्या तोंडाशी राम मारिआला किस करत होता. मी तसाच धडपडत जिना उतरलो.....

बाहेर पडल्यावर मला वाटलं हा सरळ टॅक्सीला हात करणार. पण हा तर समोर मार्केटकडे वळायला निघाला. मी म्हटलं..

'काय बाबा, काय बेत आहे तुझा?'

'जाऊया ना फिरत फिरत क्लब हाऊसवरून गेटवे पर्यंत.'

'नाय रे बाबा. एवढा टाईम नाहीये आता. तू काय सडाफटिंग तुला कोण विचारणार?'

'खरंय् बाबा. पण व्हिटीपर्यंत तर येशील ना बरोबर. मी जाईन तिथून हारबरनी. निदान थोडं बोलत तरी जाऊया चालत चालत.'

नाईलाज झाल्यासारखा मी मग त्याच्या बरोबर रीगलच्या दिशेने चालायला लागलो.

चार पेग रिचवून हा माणूस सरळ चालू शकत होता! संवयीचा परिणाम. मला मात्र चालायचं खरंच जिवावर आलं होतं. म्हटलं फारतर रिगलपर्यंत जाऊया म्हणतोच आहे तर.

त्याच्या हळूहळू चालण्यावरून लक्षात आलं त्याला कांही विशेष सांगायचं असावं.

तसं असलं कि तो एकतर गेटवेला जाऊया म्हणतो किंवा मग तेच नेहमीचं ठिकाण. काळाघोडा. म्हणजे आर्ट गॅलरीच्या पायऱ्या! वाटलं बऱ्याच जणांची बरीच रहस्य त्या पायऱ्यांना माहित असतील !

'तू बोललास ते खरंय् बाबा. सडा फटिंग मी. कोण विचारणार मला. खारला खोलीवर गेलं कि लाथेनी गादी उघडून पडून रहाणार. लागली झोप तर ठीकच नाहीतर ..'

'नाहीतर पुन्हा पिणार ! स्वतःबद्दल तू फारसं सांगत नाहीस कुणाला. पण हल्ली फार प्यायला लागलायस असं मलातरी वाटायला लागलंय्.'

'दुसरं करू तरी काय शकतो मी. डेस्टिनी यार डेस्टिनी ! तुला सांगतो बापाजवळ एकटं रहायल्यामुळे फॅमिलीचं सुख म्हणजे काय ते मला माहितच नाहीय् यार.' आज तो उगाच अगतिक झाल्यासारखा वाटत होता.

'असं कां म्हणतोस? बाकी फॅमिली असेलच ना गांवाला.' हे केव्हांतरी ऐकलेलं. त्याच्याच तोंडून. बाकी आपले नुसते अंदाजच. दहाबारा वर्षांच्या सहवासात फ्रेन्डशिप होऊनही तो माझ्याशीसुद्धा कधी मोकळा झाला नाही. बाकीच्यांशी म्हणजे त्याच्या त्या सोकॉल्ड गर्लफ्रेन्डशीही तो फारसं बोललेला नसावा. फक्त एन्जॉयमेन्ट. बस्स्. हाही एक अंदाजच म्हणा. माझ्यामात्र कॉन्टॅक्टमधे होता. अगदी ब्रॅन्च बदलली तरीसुद्धा.

'यार. लहानपणीच बापाने मला अम्मापासून वेगळं केलं. केवळ तिच्या चारित्र्याच्या संशयावरून. बाप इथे नोकरीला नि आम्ही गांवाला तेसुद्धा मामाकडे. अम्मा मुलखाची तोंडाळ. तिच्या भावाचा जमिनजुमला होता. त्यावरून ती बापाला सारखे टोमणे मारायची. त्यात पुन्हा तिच्याबद्दल बापाच्या मनात संशय. किंवा ते एक निमित्तही असेल. पण बापाने अम्माला टाकली. गंमत बघ. इथे त्याला इतरानी वापरलेली गुल चालत होती. पण अम्माच्या बाबतीत तो फार पझेसिव्ह असावा. त्यात आजोळच्या मंडळीनी भर घातली. त्याना कामाला आयतंच एक माणूस मिळालं. अम्मा शेतं छान संभाळायची.'

'पण त्या दोघांनीही तुझा विचार नाही केला?'

'तेवढी त्यांची कुवत नव्हती. अम्मा तर अडाणीच. मग बापाने मला खारच्या खोलीवर आणून नंतर बोर्डिंग स्कूलमधे टाकलं. पुढे कॉलेजच्या वेळेस आणलं घरी. पण घरी गांवाला कधीच जाऊ दिलं नाही नि मलाही जावंसं वाटलं नाही. माझे सगळे इतर लाड अप्पा पुरवायचा. अगदी माझ्यासाठी इडल्यासुद्धा बनवायचा. तुला आश्चर्य वाटेल. आता आतार्यंत मी बापाला बहुमानाने पुकारायचो. अप्पा म्हणून.'

‘मग अचानक काय झालं?’ चालत चालत बोलताना मला दम लागत होता. पण आता आम्ही म्युझियमजवळ आलो होतो. राम म्हणाला . .

‘चल आपण आधी त्या पायऱ्यांवर बसू.’ आम्ही वळसा घालून निघालो. मला उगाच तो काळाघोडा तिथे असल्याचा भास झाला. पूर्वी असंच आधीच्या मैत्रिणीबरोबर तिथे बसलो असताना तो तिथे होता. काळाघोडा ! साक्षीदार; पुसून टाकलेल्या क्षणांचा. अशा कितीतरी जणांच्या चांगल्या वाईट क्षणांचा तो खरंच साक्षीदार होता. अगदी राणीच्या बागेत जाईपर्यंत.

पायऱ्यांवर कुणीतरी बुडाखाली घेतलेला पेपर तसाच ठेवून गेलेलं. आमची सोय झाली. मग तिथेच टेकलो. भोवतालची वर्दळ संपलीच होती. बसता बसता रामप्रसाद म्हणाला.

‘कळू नये ते कळलं नि मग बापाबद्दलचा उरलासुरला आदरही संपला. म्हणजे त्याचं असं झालं कि ऐन पन्नाशीतच बापाने व्हॉलंटरी रिटायरमेन्ट घेतली नि पैसे घेऊन मला न सांगता परागंदा झाला. म्हणजे एकदम अदृष्य व्हावा तसा.’

‘म्हणजे? कुठे गेला तेही नाही सांगितलं?’

‘नाही. ते आत्ता दोनतीन वर्षांपूर्वी कळवलं. पत्र लिहून. कुठून तेही माहित नाही. कॉलेज संपल्यावर मी नुकताच नोकरीला लागलो होतो. बापाने मला मोटरसायकलही घेऊन दिली. तसे लाड सगळे केले माझे. मात्र माझ्या ऐन उमेदीच्या वयात मला सोडून निघून गेला. त्यामुळे मी भरकटत गेलो. तिकडे अम्मा गेल्यामुळे आजोळी जाणं किंवा त्यांची कांही मदत घेणंही शक्य नव्हतं. नशीबाने नोकरी मिळाली होती. पण एकूण घडी विस्कटलीच. तशी ती आधीच विस्कटलेली. बरंच पुढे लग्नाचा विचार केलासुद्धा पण आधीच नको ते बघितल्यामुळे तो पक्का होत नव्हता. त्याच्या नंतर मग बापाचं पत्र मिळालं. त्याने घर कां सोडलं माहितेय्?’

‘कांहीतरी कारण असेलच ना.’

'एकदम सिरियस रिझन. तो एचआयव्ही पॉझिटिव्ह होता !!'

'काय?'

'होय. माझ्याशी संपर्क नको नि माझं भवितव्य बिघडू नये म्हणून तो दूर गेला.'

'त्यामुळे तर तुझा त्याच्याबद्दलचा आदर वाढायला हवा.'

'तीच तर गोम आहे. पहिल्यांदा वाटलं बापाने आपल्यासाठी केवढा त्याग केला म्हणून.'

'खरंच, त्यागच केला त्यानी. फॅमिली सोडणं तसं सोप्प नाहीय्.'

'खरंय्. पण नको ती देणगी देऊन गेलाय् तो मला !'

'काय?' माझ्याही नकळत मी जरा जोरात उद्गारलो.

'होय राजा. त्याचं पत्र आलं. सगळा खुलासा करणारं. पण त्याची गरज नव्हती. नशीब एवढंच कि ते त्यानी अगदी मरायला टेकल्यावर पाठवलं. कितीतरी आधीपासून तो उपचार घेत कुठेतरी रहात होता. पुण्याजवळ. त्यातून त्यावेळी ते सगळे ड्रग्ज अॅव्हेलेबल नव्हते. साताठ वर्ष काढली पण मरायलाच झाल्यावर मला पत्र घालून कळवलंन्. तिकडे अम्मा झिजून मेली होती. आम्हाला म्हणजे निदान मला तरी वाटलं कि ती शेतात राबून मेली. पूर्वीही ती सारखी आजारी पडायची. तिला कायतरी रोग असेल ह्या संशयावरून त्याने मला तिथून हलवलं हे त्याने आत्ता नंतर कळवलं...

पण शेवटी इथेही त्याच्या दुर्दैवाने पाठ सोडली नाही. त्याची नि माझीसुद्धा.

गेली दहा वर्ष मी मारिआबरोबर फिरतोय. सुरवातीलाच मी बापाला सांगितलं होतं. तेव्हांच तर तो म्हणाला कि त्याचीही मैत्रिण होती इथे. तीच गुल. तेव्हां ती खरंच होती तिथे. मी गंमतीने मारिआला सांगायचो ना

माझी स्टेपमदर म्हणून. आता बाप मरण्यापूर्वी जेव्हां पत्र मिळालं तेव्हां मी न रहावून टेस्ट करून घेतली नि शॉक बसला. आता गेली तीन वर्ष मी उपचार घेतोय्. आता सायन्स खूप ॲडव्हान्स झालंय. तरी पण लग्नाचा विचार मात्र सोडून दिला. जवळ जवळ ठरत आलेलं.'

'पण मग मारिआने नाही कांही विचारलं? तू लग्न कां मोडतोय्स ते?'

'कांहीतरी कारणं सांगून पुढे ढकललं. पण आश्चर्य म्हणजे तिने अट्टाहास नाहीकेला पुढे. मला काळजी आहे ती वेगळीच. निदान मारिआ तरी सुखरूप असू दे.'

'असं कां म्हणतोयस?' खरं तर मला कळलं त्याला काय म्हणायचंय् ते. कांहीतरी विचारायचं म्हणून विचारलं. ते दोघेही कांही सोवळे राहयलेले नसणार !! सगळं करून भागल्यावर आता काळजीशिवाय दुसरं काय करणार.

'तुला माहितेय ते. दहा वर्षात जवळ आलेले दोन तरूण जीव किती संयम पाळणार.'

'तसं कांही नसणार. नाही तर तिनेच तुला सांगितलं असतं.' वरवर म्हटलं खरं पण मनातून वाटत होतंच कि ती लग्नाचा विषय सोडून देऊन एकदम गप्प कशी झाली.

'आज ॲक्युअली मी तोच विचार करून तुम्हा दोघाना बोलावलं होतं. एकत्र. म्हटलं मारिआ बोलली तसं बारमधे बसून बोलू. पण तिला तिथे ॲम्बॅरेसिंग वाटलं असतं. फ्लर्ट वाटली तरी तशी सोवळी आहे ती. आमच्या रिलेशनशीपच्या बाबतीतही तीच माझ्यापेक्षा जास्त सिरियस आहे.'

'मग पूर्वीच लग्न कां नाही केलत्? म्हणजे बाप इथे असतानाच.' त्याचं ऐकून मीही अजाणतेपणी बाप असाच उल्लेख केला.

'बोललो ना तुला. माझी नवीनच नोकरी. जरा सेटल् होणार तो बापच निघून गेला. पुढे दोनएक वर्षातच अम्मा गेल्याचं कळालं. तेही असंच गांववाल्यांकडून. मामानी तर संबंधच तोडलेले. काय तिचं नशीब बघ. नवरा नि मुलगा असून कुलीन ब्राम्हणाघरची बाई अशी बेवारस मेली !'

'तू कधी स्वतःबद्दल बोलला नाहीस. पण एकूणच तुझं आयुष्य भरकटत गेलं म्हणायचं.'

'माझं एकटेपण मी कधी दाखवलं नाही तरी सतत जाणवत होतं की ह्या जगात आपण अगदी एकटे आहोत. जॉली मूडमधे असण्याचं फक्त नाटक होतं. लोकाना वाटायचं हा फ्लर्ट आहे. हे सारं तुला आत्ता सांगावसं वाटलं. तुला नि मारिआलासुद्धा. कारण मलाही कांहीतरी निर्णय घ्यावाच लागेल.'

मला कल्पना नव्हती हा'हॅपी गो लकी' माणूस आतून एवढा दुखावलेला असेल नि विशेष म्हणजे हया अतिखाजगी गोष्टी बोलण्याएवढा तो मला जवळचा मानत असेल.

वयातलं अंतरसुद्धा विसरून !

'मग आता काय निर्णय घेणार आहेस?'

'वाटतं मारिआला सत्य सांगून टाकावं. खरं तर तोच विचार होता आज. आता तू आम्हाला जिन्यावर किस करताना पाहयलंस ते माझ्या लक्षात आलं. पण पुन्हा तिला गांठून सारं सांगणं जमेल कि नाही कुणास ठाऊक म्हणून हाच शेवटचा निरोप घेतला. इतरांशी संबंध फक्त 'हाय हॅलो' पुरतेच होते. पण मारिआशी असलेलं रिलेशन संपवणं कठीण जातंय् यार.'

'पण खरं कारण कळलं तर ती तेवढी दुखावणार नाही. पुन्हा मुद्दाम भेट तिला.'

'नाही जमण्यासारखं. कारण माझा निर्णय झालाय्.'

'लग्न न करण्याचा ना. तसं सांग ना मग तिला.'

'ते तर आहेच. पण नंतर मीही बापाच्याच मार्गाने जायचं ठरवलंय्. दूर. जिथे कोणी ओळखणार नाही किंवा भेटणारही नाही.'

'बापरे. असला वेडेपणा करू नकोस. ट्रीटमेन्ट घेऊन तू नॉर्मल आयुष्य जगू शकतोस. इथे तुला केव्हांही मदत मिळू शकते.'

'तेच मला नकोय्. अगतिक होऊन दुसऱ्याच्या सहानुभूतिवर जगायचं नाहीय् मला. त्यापेक्षा दूर जाऊन शांतपणे येईल तेव्हां मरणाला सामोरं जायचं.'

'ही तुझी कल्पनाच भन्नाट आहे. नेहमीसारखीच. तुला आम्हाला हे सांगावंसं वाटलं म्हणजे कांही विशेष भावना होती म्हणूनच ना. मग मारिआचाही रितसर निरोप तरी घे. से बाय फॉर एव्हर. म्हणजे तीही लग्न करायला मोकळी.'

'तुला वाटतं ती मला सोडील? त्यापेक्षा तिला अज्ञानातलं सुख अनुभवू दे. केव्हांतरी तिला कळेलच.'

'कसं?'

'पेपरमधे. मरण्याआधी मीच माझी बातमी देईन.'

'त्याआधीच ती तुझा शोध घेत माझ्याकडे येईल रे. तेव्हां मी काय सांगू तिला?'

'तेव्हां मग सांग. हेच जे मी पेपरमधे देणार ते. के. एस्. शिवरामनचा मुलगा के. एस्.

रामप्रसाद एड्सने मेला म्हणून.'

'तू जिवंत असतानाच ! पण तू नांव काय म्हणालास बापाचं?'

'के. एस्. शिवरामन. माझ्या आज्याचं नांव षणमुगम् म्हणून माझा बाप एस्. शिवरामन् नि तो शिवरामन म्हणून मी एस्. रामप्रसाद.' आपलं मरण तो स्वतःच्या डोळयानी पहात होता. कारण हे तो अगदी सहज सांगत होता. पण मला झटका बसला तो वेगळाच.

ह्या साऊथच्या लोकांच्या नांवाचा घोळ लक्षात घेतला तरी हा रामप्रसाद म्हणजे के. एस्. शिवरामन्चाच मुलगा ! हे सत्य होतं. कारण त्याने गुलचा उल्लेख गंमतीने का होईना स्टेपमदर असा केला होता. म्हणजे हा त्याच आमच्या शिवरामनचाच मुलगा. त्यावेळी त्याचीही फारशी माहिती नव्हती. तो परमनन्ट एम्प्लॉई नि आम्ही कांही जण फक्त सातआठ महिन्यापुरतेच होतो. मग संपर्कच नव्हता.

काय नियती पहा. हे वर्तुळ असं पुरं झालं. नि मी त्याचा साक्षीदार. पंचवीस वर्षांच्या गॅपनंतर हे कळलं. रामप्रसाद समोर असूनही. कालाय् तस्मै नमः.

मला गप्प झालेला पाहून रामने अपेक्षेने माझ्याकडे पाहयलं. पण मी मात्र माझ्याच विचारात गढून गेल्यासारखा. त्याला जुनी ओळख सांगावी कि नाही हयाचा निर्णय होत नव्हता. मग वाटलं. असू दे त्यालाही अज्ञानातच. सुख नसलं तरी निदान माझ्यासारख्या त्याच्या दृष्टीने विश्वासातल्या माणसासमोर कुचंबणा तरी नको !

'म्हणजे हिस्टरी रिपीट्स म्हणतात ते खरंय् तर !' मी एक सुस्कारा सोडत म्हटलं.

'आता हिस्टरी रिपीट नाही होणार ! इजा बिजा झाला तरी आता तिजा कुणी नाहीच.'

'चला. उशीर झालाय्. निघूया.'

'हो. तुझ्यासाठी तरी निघायलाच हवं. मी काय सडाफटिंग. आणि हा टॉन्ट नव्हे. वस्तुस्थिती आहे ती. आता तर मी मोकळाच. चारी दिशाही माझ्यासाठी मोकळया.'

'म्हणजे?' कसं रिॲक्ट व्हावं कळत नव्हतं. पण वाटलं ह्यानेसुद्धा बापासारखंच कांही ठरवलं नसलं म्हणजे मिळवली.

'म्हणजे रिझाईन केलं. आता मी ऑफिसला नाही जात. एक आठवडा झाला. इथले व्यवहार गुंडाळतोय्. कुठे जायचं ते ठरवतोय्. एखाद्या आरोग्यकेन्द्रात भरती होता येईल किंवा असंच दूर कोणी ओळखीचं नसेल तिथे जायचं. बापासारखंच! फक्त एक अनामिक केव्हां मेला हे लोकाना शेवटी तरी कळावं ह्यासाठी तुला त्रास देईन केव्हांतरी.'

ही भयंकर वस्तुस्थिती एकदम अंगावर घेण्याइतकी माझी कुवत नव्हती हेच खरं. त्याचं सारं ठरलेलंच होतं बहुतेक. नाईलाज झाल्यासारखे बुडाला चिकटलेले पेपर चुरगळून टाकित उठावंच लागलं. त्याच्या चुरगळलेल्या भवितव्यासारखे. . . .

टॅक्सीने व्हीटीला आलो. खरं तर बोलायचं कांही उरलंच नव्हतं तरी तो चर्चगेटला न जाता केवळ माझ्यासाठी माझ्याबरोबर व्हीटीला आला. मी माझ्या गाडीला. मुलुंडला जायला नि तो हारबरला. खारला त्याची म्हणजे बापाची खोली होती. संन्यासाच्या मठीसारखी. हेही मुद्दाम नाही पण असंच केव्हांतरी सहजच बोललेला. बापासारखाच तोही सडाफटिंग राह्यला नि सगळयांना म्हणजे अगदी त्याच्या त्या सोकॉल्ड सोशल फ्रे0डसनाही कधी घरी नेलं नसणार. त्याने सोशल नि पर्सनल असे आयुष्याचे दोन स्वतंत्र कप्पे केले असावेत !

टॅक्सीत त्याने माझा हात धरून ठेवला होता. मूकपणे केवळ स्पर्शातून भावना व्यक्त करण्याएवढा तो भावूक झाला होता. जसा परत कधी भेटणारच नव्हता.

'तुझा सेलनंबर देशील?' शक्यता कमीच होती तरी विचारलंच.

'काय उपयोग? मी तो डिस्कनेक्ट करणार ना. शिवाय सगळयापासून दूर जायचंच तर कशाला हा मोह?'

'मला वाटतंय् कि तू अजूनही विचार करावास. एकदम अज्ञातवासात जाऊ नयेस. तुझ्या बापासारखं अनामिक आयुष्य जगायला.'

'पण इथे जगण्याचीच शाश्वति नाहीय्. किती वर्ष? फक्त कांही वर्षच उरलीयेत. मग ही गुंतवणूक कशाला.'

'तरीही मारिआ जर तुझ्या बाबतीत सिरियस असेल तर तिचा विचार करावास असं वाटतं.'

माझ्या हया कन्सोलेशनचा कांही उपयोग नाही हे मलाही माहित होतं. फक्त शब्दांचे बुडबुडे. तेही फसवे. खरं तर त्याचा निर्णय त्याच्या परीने बरोबर असावा असंही वाटत होतं.

निराशेच्या अंधाराला सामोरं जाताना तो तरी दुसरं काय करू शकत होता. मारिआपासून दूर होऊन तो तिला वाचवायला पहात होता हा त्याचाही त्यागच. खरं काय ते नियतीच जाणे. . .

आम्ही एकमेकांचा निरोप घेतला तेव्हां तो खूप हळवा झालाय असं वाटलं नि ते तसं स्वाभाविकही होतं. मलाही स्वतःला सावरणं तसं अवघडच झालं होतं. कांही न खातापिता बेडवर आडवा झालो तेव्हां बायकोला वाटलं जास्त प्यायल्यामुळे असेल. पण फारसं न पिताही किंवा त्यामुळेच असेल पण डोक्यात चित्रविचित्र विचारांची एक वेगळीच नशा होती. ज्यात गुंतून पडावं अशी. एक गोंधळ. नियतीने निर्माण केलेला ! . . . .

येणाऱ्या विचारांना थोपवून रोजच्या रूटिनमधे गुंतून गेलो. साधारण महिना उलटला असेल नि एक दिवस ऑफिसमधेच फोन आला. रामप्रसादचाच. मी चक्रावून गेलो. म्हणाला. .

'आज भेटशील कां?'

‘कुठे?’ मला वाटलं तो बाहेरगांवाहून बोलतोय.

‘नेहमीच्याच जागी.’ बापरे. म्हणजे पुन्हा काळा घोडा नि आर्ट गॅलरीच्या पायऱ्या ! आता हयाला काय सांगायचं असणार.

‘तू अजून इथेच आहेस?’

‘हो. त्याबद्दलच बोलायचंय्. भेट.’ जास्त न बोलता त्याने फोन ठेवला.

पुन्हा तीच सगळी तापदायक कसरत मला नकोशी वाटत होती. पण गेलो. तो तर एकदम मूडमधे दिसत होता. वाटलं त्याने पूर्वी सांगितलेली हकिगत खोटी ठरली तर. .

पण नियतीला तेही मान्य नसावं !

ठरल्या दिवशी भेटायला गेलो तर नेहमी वाट पहायला लावणारा हा माझीच वाट पहात होता ; माझ्याही आधी येऊन. ह्यावेळी आत कांही प्रदर्शन वगैरे नसावं. फारशी वर्दळ नव्हती. तरीही कोपरा पाहून बसलो. उत्कंठेने. ह्याचं काय काम असावं अंदाज येत नव्हता.

‘तुला आश्चर्य वाटलं असेल पण मी माझा निर्णय बदलला. म्हणजे बदलावा लागला.’

‘कां? नोकरी सोडणार नाहीस कां?’

‘ती सोडलीच आहे. सगळया डयूज मिळाल्या नि इन्व्हेस्टसुद्धा केल्या.’

‘मग? बाहेरगांवी जाणार नाहीस कां? बरंच आहे मग. इथे इलाज चालू राहील.’

‘जाणार आहेच. पण दुसरीकडे. गोव्याला.’

‘काय?’

'हो. मी लग्न करतोय्. मारिआशी.'

'अच्छा. म्हणजे हा निर्णय बदललास तर. मारिआ तयार झाली?'

'हो. रॅदर तिनेच इन्सिस्ट केलं.'

'सगळं समजूनही? का तू तिला सांगितलं नाहीस? आणि तुझा कॉन्टॅक्ट कसा झाला?

तू तर तिला भेटणार नव्हतास.'

'मी नाही. तीच भेटली मला येऊन. आपण भेटल्याच्या दोनच दिवसानी तिने कॉन्टक्ट केलं. म्हणाली अर्जन्ट भेटायचंय्. तिलाही मला तेव्हांच कांही सांगायचं होतं. पण तू बरोबर असल्यामुळे तिने टाळलं तरी तिला माझं वागणं संशयास्पद वाटलं. स्पेशली मी गुडबाय् किस केलं ते.'

'मग? भेटलास?'

'हो. इथेच. ह्याच जागीं. आणि तेव्हां मात्र मला टाळता नाही आलं. तिने खोदून खोदून विचारलं. मग आम्ही गेटवेला जाऊन बसलो नि मी तिला सगळं सांगितलं. माझ्या बापा बद्दलही. आय कुड नॉट कन्ट्रोल मायसेल्फ.'

'तिची रिॲक्शन काय होती?'

'फार गंभीर नव्हती. कारण तिनेही बराच विचार केला असावा. तिनेच मग असं प्रपोज केलं कि आपण गोव्याला जाऊन राहू. लग्न करून. तीही नोकरी सोडायला तयार झाली.'

'इतक्या सहज? आणि गोव्यालाच कां? तू तर अज्ञात ठिकाणी जायचं म्हणत होतास.'

'हो. पण गोव्याला आन्टीचं घर रिकामं पडून आहे. म्हणाली आपण तिथे सेटल् होऊ'

'केव्हां जाणार आहात?'

'आठवड्याभरात. आन्टी पुढे गेलेय घर साफ करायला. पुढच्या महिन्यात म्हणजे बहुतेक तिच्या ख्रिसमसनंतर लग्न करणार आहोत.'

'इतक्या तडकाफडकी निर्णय घेतलात?'

'हो. म्हणजे घ्यावाच लागला.'

'बापरे. कांही विशेष?' माझ्या प्रश्नाचा रोख त्याला कळला.

'तुला वाटतंय तसं कांही नाही. आणि तसं आता होऊ देणार नाही. आय डोन्ट वॉन्ट द हिस्टरी टु बी रिपीटेड.'

'मग? एवढया घाईने कां? आय होप तू पूर्ण विचार केला असशील.'

'नक्कीच केलाय. म्हणूनच डिसिजन घेतला. तेवढेच जास्त दिवस एकमेकांचा सहवास.

कारण माझी भीति खरी ठरली.'

'कसली भीति?' म्हटलं नि माझ्या डोक्यात प्रकाश पडला.'ओह्. नो.'

'ओह्. येस् ! त्याच दिवशी तिला मला हे सांगायचं होतं. आता ही फॅक्ट ॲक्सेप्ट करायलाच पाहिजे. गेल्या दोन वर्षात जमत नव्हतं तरी मी मारिआपासून डिटॅच व्हायचा प्रयत्न केला. तेव्हां तिला संशय आला. मी कळू दिलं नाही. पण तिने गेस केलं नि काय वाटलं ते अलिकडेच तिनेही टेस्ट करून घेतल्या. तीही मला हे सांगायची संधी शोधत होतीच.'

ऐकून डोकं चक्रावलंच. आता मात्र खरंच वर्तुळ पूर्ण झालं !

'गॉड ब्लेस यू.' माझ्या तोंडून अभावितपणे शब्द बाहेर पडले.

'या. वुई नीड यूअर ब्लेसिंग्ज.' उठता उठता तो म्हणाला.

सुन्न झालो होतो तरी कुले झटकित उठावंच लागलं.

'इटस् अ गुड डिसिजन. टेक केअर.'

त्याच्याकडे बघणं शक्य झालं नाही. मी समोर बघत होतो. नसलेला काळा घोडा. असल्या कितीतरी घटनांचा मूक साक्षीदार. तो नव्हता तिथे. वाटलं असता तरी काय फरक पडणार होता. घटना घडतच असतात! आपण कसं रिॲक्ट व्हायचं ते ज्याचं त्याने ठरवायचं.

भारावल्या सुरात म्हटलं'कॉग्रॅट्स.' नि त्याचा हात दाबला.' तुम्हा दोघाना माझ्या शुभेच्छा.'

एकदाच वळून बघितलं. तो डोळे पुसत होता! मग मात्र मागे न वळता चौक क्रॉस केला. तोच काळया घोडयाचा रिकामा चौक.

•••••

# . . वारं . .

'रे झिला बापूस खंय् गेलो एद्या सक्काळीच?' अंगणाच्या पेळेवर डाव्या तळव्यात राखुंडी घेऊन दात घासणाऱ्या वाशाला; वईवर लुगडं वाळत घालणारी पावसकरीण विचारत असते. वाशा नुसताच खालचा ओठ मुडपतो. माहित नाही हे सांगण्यासाठी.

'नि तेच्या वांगडा कोन गेलाहा?'

'कोनओ जाऊक नाय.' वाशाने अखेर तोंड उचकटलं.

'नाय कसा. मिया बगलंय्. कोनतरी होता तेच्या वांगडा. बाई लमाणूस.'

'नाय बा.'

'मेल्या खोटा आणिक कित्या सांगतंस. चेडू गेलाहा ना?'

'कोन?'

'मेल्या भैण तुजी. कमळया दिसला नाय् बावीवर पाणी भरूक ता?'

'असतला घरातच.' मख्खपणे वाशा लोटा घेऊन उठला नि समोरच्या वईजवळून गोठयामागे असलेल्या शेणाच्या गायरीजवळ तोंड धुवायला गेला.

म्हातारी मागे वळली तो दारात सून उभी. सुमति हल्ली थोडंथोडं म्हातारीला बोलायला लागली होती. न भीता.

'तुमका सगळया दुनियेच्या पंचाती. गेले असतीत खंय् तेंच्या पावण्याहारी.'

'गे माजे आवशी. तो स्टॅन्डावर जाऊक नाय. वरल्या गडग्यातसून सडयावर कशाक जातलो मगे. कायतरी गोम आसात.' म्हातारी पडवीच्या पावठणीवर बसत म्हणाली.

एवढयात आपल्या पडवीच्या दाराशी आलेल्या धकलीने हे ऐकलं.
.

धकली म्हणजे म्हाताऱ्या पावसकरणीची धाकटी जाऊ. शांता तिचं नांव. होती म्हातारीच्याच माहेरची. मुणगेकर पाव्हण्यांचीच नातलग. पण शहरात राह्यलेली. चार बुकं शिकलेली. रूप नि नांवही तिला नि सहदेवालासुध्दा साजेसंच होतं. पण गांवात आली नि धाकटी म्हणून तिची धकली झाली. तसंसुध्दा तीच सारं धकवून नेत होती म्हणूनही धकलीच. हे बामणवाडयातल्या

भटीणकाकूने ठेवलेलं नांव. . .

'तुमका घरातली पेज गिळना झाली का काय? जंयथंय गोमच दिसता. सडयावरसून ते तळयाच्या बाजाराक गेले हंत बैल हाडूक. जोताचो एकच बैल हा. रेडो काम देयनासो झालो मगे काय करूचा? तुमचो देतलास? गुदस्ता मळणीच्या टायमाक् झिलान् काय सांगल्यान् ता इचारा तेका.' धकली करवादली तरी जावेला कधी म्हातारे असं म्हणायची नाही.

म्हातारी थंड झाली. धकलीचा रागही बरोबर होता. गेल्या साली लंगडया तुकारामाने आपल्या धाकटया काकाला, सहदेवाला जोताला मदत केली नव्हती. तो बिचारा जिल्हा परिषदेतली नोकरी संभाळून आपल्या वाटयाची जमीन कसतोय. वेळ पडली तर पैरी लावून. ती तरी कुठे मिळताहेत आताशे. सगळयांचे चाकरमाने मनिऑर्डरी पाठवतात. सगळयानाच पैऱ्याला माणसं लागतात. ती उरल्येत कुठे गांवात. नि कांही शहाण्या भटानी आपापल्या जमिनी कुळकायद्याच्या आधीच ताब्यात घेऊन अर्धेलीने करायला

सुरूवात केलेली. ज्यांची स्वतःची जमीन नाही ते अशा जमीनीवर आधीच बांधलेले. वर आणि कलमांचं उत्पन्न. इकडे धकली दोन पोरांचं संभाळून वर नवऱ्याला मदत करतेय्. आपण काय करतोय्. नुसती पेज गिळत सगळयांवर रूबाब गाजवतोय असं क्षणभर म्हातारीला वाटलं. पण ते तेवढंच. कुरापती काढण्याचा स्वभाव कांही बदलणार नव्हताच. त्यात आपण एकटे पडल्याची जाणीव होतीच. मग कोणीच नाही तर गाबतिणीशी कुरबूर. धकलीला चांगलं म्हावरं दिलंस वगैरे.

जिभेला खाज तर होतीच. म्हावरं म्हणजे तिचा जीव. मग रोख पैसे नसले तर भाताचं माप देऊनही सुनेला मासळी घ्यायला लावायची. धाकटयांचं नांव पुढे करून. तुक्याला हे पसंत नसलं तरी दुर्लक्ष करावं लागे.

'रोखीन् पैशे देत्त त्यांका चांगली म्हावरा देतंस गे?' ती धकलीला टोमणा मारित गाबतिणीला म्हणायची.'मिया भात देऊक् नाय् तुका?'

'तेणा काय होताहा गे? मगे कणीकोंडा ठेवूक नाय कित्या?' गाबतिणीचा चढा सूर. आताशे भातगिरणीत तांदूळ करून आणल्यावर कणीकोंडा कुठून ठेवणार. बरंय्. निदान घिरटीचा त्रास वाचला. पण रोख पैसे द्यावे लागतात. ते आणणार कुठून. मग त्याची कटकट.

मग न्हाणीजवळ सामाईक पाटयावर धकलीने वाटण केलं कि तिचा जीव जळायचा. अशीच तिची सतत भुणभुण चालू असायची. आतासुद्धा नवरा दोन दिवस सुटीवर आला म्हणून धकलीने कमळीला गांवात गाबतिणीकडे बाजारासाठी पाठवलं होतं. ती बिचारी सकाळीच बापाबरोबर वरच्या रस्त्याने गेली होती. त्यातही म्हातारीला गोम दिसली! वाशानेही शाळेला दांडी मारलेली. थोडया वेळाने कमळी बाजार घेऊन आलेली म्हातारीने बघितली. रिकामपणी पडवीच्या पावठणीवर बसून आल्यागेल्याला टोकणं हाच एक चाळा होता तिला. शिवाय कमळी घराला वळसा घालून बावीकडे मागच्या बाजूला पाय धुवायला न जाता बाजूच्या दरवाजाने आत गेली. म्हणजे ही बया नक्कीच बाहेरची असणार. नुसत्या अंदाजावर तिने बडबड सुरू केली.

'गो. . शिरा इली तेका. आपडीचा चेडू घरात रिघताहा नि आवशीक पत्त्यो नाय्.'. .

दोन वर्षांमागे तुक्याचा बाप, पांडया पावसकर गेला. दमेकरी होताच. त्यात निमित्त झालं तापाचं. तो उठलाच नाही. त्याला बहुतेक माहित असावं असं होणार म्हणून. दोनच वर्ष आधी त्याने जमीनीचे नि घराचे वाटे करून टाकले. त्याला सारखा संशय यायचा. आपल्यात नि भावात पंधरा वर्षांचं अंतर. शिवाय तो तालुक्याला राहून शिकलेला नि आता जिल्हा परिषदेत नोकरी. आपल्या माघारी आपल्या पायाने अधू पोराला ,तुक्याला तो फसवील हा संशय. शिवाय म्हाताऱ्या रूक्मिणीचीही कटकट. तिला धकलीशी पटवून घेता यायचं नाही. लंगडयाचं लग्न करून घरात सून आली तरीसुद्धा तिची धकलीशी सतत धुसफूस चालूच. म्हणून पांडयाने पुढच्या पडवीत नि माजघरात भिंत घालून घराचे दोन हिस्से केले. धकलीचं रांधपघर बाळंतिणीच्या खोलीत गेलं नि तिचा परसातला नि बावीवरचा वावर बाजूच्या दाराने सुरू झाला. नाही म्हणायला पुढलं अंगण नि तुळशीवृंदावन मात्र सामायिकच रहायलं.




बाप गेल्यावर मग तुक्याने त्याच्या घराच्या बाजूने पोफळीचे वासे टाकून एक पडवी काढली नि भाताचे मुढे ठेवायची सोय केली. पण सहदेवाला साठवणाला खोली उरली नाही. त्याची मुलं पुतण्यापेक्षा थोडी लहान होती. तरी पुढेमागे कायतरी सोय करा अशी धकलीने भुणभुण लावली होती. कारण त्याला महिन्याचा पगार मिळत होता. नि शिवाय पडका मांगर त्याच्या हिश्शात आला होता. जमलं तर घर बांधून काढा असा धकलीचा सूर. पडक्या मांगराच्या बदल्यात मेरेवरली दोन झाडं तुक्याकडे गेलेली. एक पंढऱ्या फणस नि दुसरा रातांबा. तोही खूष. कारण त्याच्याकडे रोख पैशांची

चणाचणाच. तसे चुलते पुतणे एकमेकाला विचारून असत. कारण पुतण्याला त्याच्या शाळेत घातलेल्या मुलासाठी कायम पैशांची गरज लागायची. सहदेवाच्या मुलीने, कमळीने सातवीनंतर शाळा सोडलेली नि वाशा अजून नववीतच होता.

एकूण सगळयांचं गोडीगुलाबीने बरं चाललं होतं. पण म्हातारी रूक्मिणी पावसकरीण उगाच काडया घालीत बसे. अगदी गौर सजवतानासुद्धा. कारण गौर नि गणपती तिच्या घरात बसत असत. धकली जाऊन मदत करी. आपली बऱ्यातली साडी ती सुमतिला, तुक्याच्या बायकोला नेसायला देई. गौरीलाही आपला एखादा दागिना घाली. हे सारं म्हातारीला बघवायचं नाही. वाडीतल्या, गोतातल्या बायकाही तिची गौर बघायला यायच्याच. पण बामणवाडयातल्या गौरीला आलेल्या माहेरवाशीणीही मुद्दाम येऊन तिला वाखाणायच्या.

'बरी बायो जमत्ये तुला गौर सजवायला. आम्हा ब्राम्हणांच्यात खडयांच्याच गौरी ना. फारतर तेरडा. हे असलं फक्त महालक्ष्मी असली तरच.' एकजण म्हणे.

'आईकडे आल्ये कि ती मुद्दाम सांगत्ये. जाऊन शांतीची गौर बघून या. काय सुरेख सजवत्ये. अगदी आपल्या महालक्ष्मीसारखीच. चांगली मुंबईकरीण बायको मिळाल्ये सहदेवाला.'

'आणि नैवेद्याचं तरी काय काय करत असते.'

'ते बरीक सांगू नकोस. त्यांच्यात असतं ते तसलं. वडे नि सागोती.'

बामणवाडयातल्या माहेरवाशिणी धकलीची तारीफ करायच्या. मग ती म्हणे. . .

'नाय बा. हल्ली आमच्याकडेन् असला काय करत नायत् हां. मी तुमच्या बामणांसाराच जेवण करतंय्. तुमी काय म्हणतास तां पुरणावरणाचा कि काय, सैंपाक. . तसलाच. बघतंय्. जमतां कि नाय. आमच्या म्हाएराक् देवाक् वशाट करूची चाल नाय्.'

'असं कसं ग पण?'

'आमची भगवती असा ना. तिचो कुळाचार असतां. नि हंय भावोजी होते तंवसर त्यांच्यावर वारां येई ना. उत्सवात अवसर धरल्यानी मगे घुमत नि आता झिलाच्याय् येतला ना. मगे असला कायओ कामाचा नाय.' तिच्या सुरात टिंगल होती कि काय असं वाटायचं.

तुक्या पुतण्या असला तरी तिच्याहून फक्त पांचच वर्षानी लहान म्हणून ती त्याला अहो जाहो करीत असे. तो मात्र कोकणी रिवाजाप्रमाणे तिला'गे काकीबाय' असं पुकारीत असे.

ती आपल्या बामणवाड्यातल्या पाव्हण्याना सांगत होती ते खरं होतं. पांड्या पावसकर गावच्या उत्सवातला एक मानकरी होता. चैत्री नवरात्रानंतरच्या उत्सवात, अक्षय्य तृतियेला भावईची पालखी निघे तेव्हां तो अवसर घेऊन पालखीच्या मागे धावे. दम्यामुळे कधी कधी जमायचं नाही. पण शेवटपर्यंत त्याने आपली जबाबदारी निभावून नेली. नंतर तुक्या ते कामसंभाळायला लागला. वरती मुखवटा बसवलेला दीड पुरूष उंचीचा नि मुसळासारखा जाड नि जड अवसर उचलून पालखीमागे धावताना तुक्याची दमछाक होई.

त्यांची कुलस्वामिनी देवीच असल्यामुळे आल्या आल्या धकलीने म्हातारीची वशट नैवेद्याची जुनी प्रथा मोडून काढलीन्.

म्हातारीच्या खाजऱ्या जीभेला एरवी संधी मिळायची नाही नि गौरींच्या नांवाखाली ओशट खायला मिळत होतं ते ह्या शांतिमुळे बंद झालं. तिने दिराला देवीच्याच नैवेद्याची शपथ घातली नि मग नवरात्रातलं कोंबडं नि गौरीच्या नैवेद्यातलं मटण बंद झालं. धकलीच्या थोड्याफार शिक्षणाचा असा

फायदा झाला. नवरात्रातला एक बळी बंद झाला नि हळूहळू आवाठातल्या सगळयाना हे पटलं. तिथे तिचं कौतुक झालंच. पण आता बामणवाडयातलीही बायामाणसं मुद्दाम येऊन कौतुक करायला लागली. मग असलं कौतुक ऐकून तर म्हातारी अजूनच चिडायची.

तिला स्वतःला यायचं कांहीच नाही. अगदी शेणी लावायलासुद्धा. पण सगळयांवर जोरा दाखवायची खुमखुमी मात्र होती. जास्त करून स्वतःच खुळया ठरवलेल्या सुनेला. सुमतिला. मग सुमतिलाही काकीबायचा आधार वाटायचा. म्हणून तिच्यावरही म्हातारी उगाचंच करवादत बसे. ती बिचारी गरीब घरातली होती. म्हणून दिसायला बरी असूनही अधू नवऱ्याकडे पडली. सासरा असेपर्यंत पडवीतही यायला घाबरायची. परिस्थिती बेताची. पोराना पेज वाढून उरली नाही तर भुकेनी वखवखल्या पोटात कायतरी भरायसाठी गडग्यात जाऊन पडीक रायवळ आंबे नाहीतर काजूची बोंडंही चघळायची. वर म्हातारीचं तोंड चालूच. चहा एकदाच. मग दुपारीच काय ते जेवण.

वेगळी चूल झाल्यावर धकली तिला मागच्या दाराने बोलावून चहा द्यायची. तिची चूल बाजूच्या बाळंतिणीच्या खोलीत नि वावर बाजूच्या दाराने. त्यामुळे कुणाला कळायचं नाही. मग ती धकलीला दुपारच्या वेळी हीर तासायला नि पत्रावळी लावायला मदत करायची. पत्रावळींसाठी फणसाची पानं आणून द्यायची.

सासू सासऱ्यानी तिला खुळीच ठरवली होती. कारण ती म्हणे भटांच्या घरी जाऊनही खायला मागायची. आपला गोठा झाडून झाल्यावर ती बामणवाडयातल्या भटीणकाकूकडे गोठा झाडायला जायची. दोन पैसे मिळतील म्हणून. अर्थात् सासरा मेल्यावरच. पण तिथे रोज चहा मागायला लागली म्हणून भटणीने उठवलं कि ती म्हशीच्या आंबोणातली पेंड धुवून खाते!

झालं. तुक्याने तिचं काम बंद केलं नि तिच्या खुळेपणावर शिक्का बसला. तिला आसरा फक्त काकीबायचा. म्हणजे धकलीचा. धकली तशी उरक्याची होती. एकहाती बरीच कामं निभावून नेई. ढोरं रिघायला लागली म्हणून गडग्याची पडकी भिंत खुळीला मदतीला घेऊन लिंपून

काढलीन्. उन्हाळयात असो कि पावसाळयात; परसातल्या तिच्या हिश्शात कायम कायतरी बियाणं घातलेलं असे. तिच्याकडे बारा महिने हिरव्या मिरच्या असत. आलं नि हळदही लावायची. भोपळीचा वेल तर असेच. अशी तिची कामं चालूच असत.

शिवाय ती पुतण्याला बोलावून कायकाय करायला शिकवी. मग वाडयात, भाऊबंदात थोरल्या पावसकरणीला कोणी विचारीनासं झालं. सगळे धकलीलाच विचारून काय ते करीत. म्हातारी मग सगळा राग काढायसाठी कांहीतरी उचापती करीत बसे...

तळयाच्या बाजारातून बैल आणायला सहदेवाला रात्रसुद्धा होईल. मग ही बया म्हावरं कुणासाठी रांधतेय् हे कळेना. म्हणून आत्ताच ह्याचा शोध घ्यायला हवा असंही म्हातारीला वाटून गेलं. मग कुल्यावर हात ठेवून अंगणात उगाच फेऱ्या मारणं सुरू झालं.

साठीला आली तरी म्हातारी ताठ होती. खाऊनपिऊन होती नि वर कामधंदा करायचा नाही. रापलेला वर्ण, पांढुरक्या बिनतेलाच्या केसांची पोफळाएवढी बुचडी, कानात मासोळया, गळयात तीन पुतळयांचं गांठलं नि हातात चांदीचे गोठ, वर गुडघ्यावर नेसलेलं घट्ट लुगडं असा तिचा एकूण अवतार. एकतर बडबडत तरी असायची नायतर कुल्यावर दोन्ही हाताची उलटी घडी धरून अंगणात फेऱ्या मारत रहायची. गडग्यापलिकडे वाटसरू दिसला कि हिची टकळी सुरू. सुनेला म्हणताना हिलाच खूळ भरलंय् असं वाटायचं...

तुक्या आपल्या कुणग्यातनं राब टाकायला गेलेला. धाकटा अंगणात, म्हातारीच्या समोरच बसून आयशीने पत्रावळींसाठी आणलेल्या फणसाच्या पानांचे बैल करून खेळत होता; नि थोरला शाळेतून यायला झालेला. म्हणून सुमतिने तपेल्याच्या बुडाला माती लावून चुलीवर भात

शिजायला टाकला. घासलेट जपून वापरायचं म्हणून तालुक्याहून सहदेवाने आणून दिलेला एकुलता एक स्टोव्ह कोन्यात ठेवून दिलेला. होईल सावकाश म्हणून तिने दगडीवरच्या रोवळीत रतांबे सोलून टाकायला सुरवात केली. तिला माहित होतं कि शेजारी कायतरी शिजतंय्. काकीबाय् पोरांसाठी दिल्याशिवाय रहायची नाय.

पण तेवढयात म्हातारीचा पोटसूळ सुरू झाला. जेवणाला उशीर होतोय् म्हणून.

खरंतर सकाळीच पंढऱ्यावरचा कापा फणस तुक्याने पोरांसाठी फोडला तेव्हां तिचं हादडून झालं होतंच. त्याने तर खरोखरीचं पोट दुखलं असतं. तरीही तिलाही शेजारी कायतरी बाजार शिजतोय् नि पोरांसाठी तरी थोडंफार येईलच ह्याची खात्रीच होती. पण काय ते जाणून घ्यायसाठी सुनेला गाळी दिल्या म्हणजे धकली येईलच मधे पडायला. मग कळेलच असं वाटत होतं.

यंदा तुक्याने रोख पैशांसाठी दोन्ही कलमं व्यापाऱ्याला दिली होती. चान्यानी चोचवलेले चारदोन आंबे नाहीतर कुणाच्या तरी गडग्यातले रायवळ आंबे सुमति गोळा करून ठेवी. पोरांसाठी. तिला खुळी म्हणताना म्हातारीसुद्धा त्यातला एखादा खाई! नाहीतर अशीच बडबड करत बसे.

पण तिच्या बडबडीकडे कुणीही लक्ष देत नसे!

दुपारी मग राब टाकलेल्या कुणग्यात काडी पेटवून तुक्या जेवायला घरी आला. पाय धुवून तो रांधपघरात आला तो सुमतिने त्याच्याबरोबरच म्हातारीसाठीही पत्रावळ टाकली. म्हातारी लगेच येऊन बसली. तुक्याने आपल्या पत्रावळीवर पाण्याचा हात फिरवला तशी सुमतिने भात वाढला. तोच म्हातारीची टकळी सुरू.

'शेजारी बगान् ये जा कायकाय शिज्ताहा तां. बांगड्याचा कालवाण. नि आमका काय तर भात नि कोकमाचा सार. शिरा इली ती ह्या खुळग्याक् काय रांधता येता कि काय?'

'म्हातारे , तुजी जीभ लयच चटावली हा बाजाराशाटना. सक्कळीच गरे खाल्लंस नाय गे, रोजच चपात्या खाउक आपण काय बामणा असात् काय? तीओ रोज चपात्यो खाउक नाय्.' मग बायकोकडे वळून तो म्हणाला .'पोरानी खल्ल्यानी हा गो?'

सुमतिने नुसतीच मान हलवलीन्.

आपलं जेवण झाल्यावर मग सुमतिने रांधपघराच्या भिंतीत पुरलेल्या मोघ्यामधला रतांबतेलाचा गोळा काढून नवऱ्यापुढे केला. पावलाना लावायसाठी. कारण अपघाताने वाकडं झालेल्या पावलात वहाण घालता येत नव्हतीच. मग तो बिचारा अनवाणीच जाययायचा. पाय भाजत....

पूर्वी केव्हांतरी अर्धवट वयाचा तुक्या गांवच्या उत्सवात बामणवाड्यातल्या कुणाची तरी मानाची दीपमाळ पाजळायला चढला होता. परंपरेनी जुन्या कुळांकडे आलेलं मानाचं काम. काका नुकताच नोकरीला लागलेला नि बापाला धाप लागलेली. त्यात आणि त्याला अवसर घेऊन पालखीबरोबर जायलाच पाहिजे नाहीतर देवीचा कोप. मग धाडस करून बापाच्या देखरेखीखाली तुक्याने ते काम करायला घेतलं. बापलेकानी आधी नारळ फोडून गाऱ्हाणं घातलं नि मग त्यातल्या बिनशेंडीच्या अर्धुकात तेलवात घालून सावकाश काकडा दीपमाळेच्या वरच्या खोबणीत ठेवून शिडीवरून हळुहळू खाली यायला लागला. भटणीने दिलेल्या जुनेराच्या वाती तेलात बुडवून एकेक पणती लावून बाजूच्या खोबणीतून ठेवायला लागला.

एवढयात शिडी सरकली नि एक पाय खोबणीत रोवून तुक्याने स्वतःला सांवरलं खरं पण

तेलाच्या निसरड्याने त्याचा पाय सरकला नि तुक्या सरळ खाली आला. पण पायांवर उडी घेण्याच्या नादात उजवं पाऊल मुडपलं नि घोटयाला दुखापत झाली. सहदेवाने तालुक्याच्या डॉक्टरकडे नेऊन उपाय केले. तरी उजव्या पावलात कायमचा दोष राहून गेला. तुक्याला मग कायमच लंगडत चालायची संवय झाली.

कोकणी रिवाजानुसार मग लोकाना आयतंच एक विषेशण मिळालं. लंगडा तुक्या!

मग तुक्याचं शिक्षण तिथेच संपलं. आधी आजा हयात असताना काकाचं तालुक्याच्या शाळेत शिक्षण झालेलं नि नंतर अपघाताचं निमित्त होऊन तुक्याचं शिक्षण मात्र थांबलं ते थांबलंच. पांड्या पावसकरालाही फारसं कांही वाटलं नाही. पण काकीबायचं ऐकून तुक्याला मात्र आताशे वाटायला लागलं होतं कि आपलंही शिक्षण झालं असतं तर बरं होतं. ही बारा महिन्याची ओढगस्त जाणवली नसती.....

पायाना रतामतेल लावून तुक्या बावीकडे गेला, हात धुवायला. नि समोर पहाताच त्याला कांही तरी विचित्रच वाटलं. वाश्या हातरहाटानी बावीतून पाणी काढून थंड पाण्याच्या बादल्या डोक्यावर उपड्या करत होता नि तसं करताना डोलत होता. घुमल्यासारखा!

वहाळापलिकडून कायतरी वाजल्याचा आवाज येत होता त्या तालावर स्वतःच्याच तंद्रीत कायतरी गुणगुणत होता. आधी वाटलं वहाळापलिकडे कुणाकडे कार्य असेल म्हणून ताशा वाजत होता. तसं ऐकलं नव्हतं पण असेल कायतरी. नंतर लक्षात आलं हे वेगळंच असावं. भर दुपारच्या वेळेला कायतरी विचित्रच वाटलं. देवचार आल्यासारखं. पडवीला वळसा घालून तुक्याने काकीला तिच्या रांधपघराच्या खिडकीतून पुकारलं.

'गे काकीबाय लवकर ये भाएर. ह्या झिलाक् काय झाला बग तरी. नाचताहा कसो बग देवचार इल्यासारो.'

जुन्या घरातली बाळंतखोलीची लहानशी खिडकी. त्यातून डोकावत धकली करवादली.

'आराडतास् कित्या? भाव ना तो तुमचो. हाताक् धरान् घेव्न येव्चा नाय?'

'गे भाएर ये अगोदर नि बग काय ता. माका येगळीच शंका येता.'

'असात आपल्याच नादात. थेतूर आनि शंका कसल्यो घेतास. इलय मिया तेचो देवचार काढूक.'

बाहेरचा ओरडा ऐकून धकलीच्या आधी म्हातारीच बाहेर आली. आली नि बघतच राह्यली. वाशा खरंच आपल्याच नादात होता. म्हातारीने मग पुढे जाऊन त्याचा हात धरला नि त्याला थांबवत म्हणाली.

'कोण रे बाबी तू? खंयसून इलंस? आमच्या वाडीयेतलो नाय हंस ना? आमचा काय ऱ्हवला हा काय करूचा?'

तिच्या ह्या प्रश्नांच्या सरबत्तीने वाशा गांगरला नि खुळयासारखा पहातच राह्यला. वर आणि गार पाण्यावर बसणाऱ्या वाऱ्यानी कुडकुडायलाही लागला. दोन्ही हात एकमेकात गुंतवून पोटाशी लांब धरून. बघणाऱ्याला वाटावं कि हा खरंच घुमतोय्. एवढयात पाठीमागच्या बाजूला आलेल्या धकलीने मग एका हाताने म्हातारीला बाजूला केलं नि दुसऱ्याने वाशाचं बखोट धरून त्याला ओढत घरात घेऊन गेली. तिच्याकडे बघत मग म्हातारी कडकडायला लागली. तिला आयतंच निमित्त मिळालं होतं.

'दिसवार बगूक नाय नि वशाट करतंत् घरात. वर आपडीचा चेडूओ हा घरात. नि मंग ह्या असला कायतरी झपाटतलाच ना.' नि मग आपल्या लेकाकडे बघून म्हणाली.

‘ रे झिला. तू आपलो गडग्यात जावन नारळ देवन ये म्हापुरषाक्. ह्येंचा कायओ खरां नाय्.’

हे सगळं रामायण ऐकून जेवण झालेली सुमति आचवायला बाहेर आली नि तिला बघून मग म्हातारीची कटकट सुरू झाली.

‘ह्या खुळग्याक् आधी सांगूक होया. पोरग्यांका खंयसर झाडाबुडी पाटवू नुको. सोता काजी हाडूक जाता ता पुरे झाला. मेल्याक् खाय खाय सुटली हा.’

सगळी वरात मग घरात गेली.

उन्हं चढत गेली नि तिकडे वाशाला पुढयात घेऊन धकली जेवण करायला लागली.

कमळीचं आधीच झालं होतं. कालवणाच्या ओढीने नि वेगळं बसवून. जेवताना वाशा मात्र तंद्रीतच होता. त्याला कळत नव्हतं. थोरल्या काकीने कायतरीच काय विचारलं असं वाटून त्याला देवचार कसा काढतात ते बघितल्याचं आठवलं. गांवकर आळीतल्या त्याच्या शाळासोबत्याला मांत्रिकाने लिंबाच्या डहाळीने झोडपलं होतं. नि एकदा तर थोरलीने सुमतिलाही तसंच कायतरी केलेलं. विचारांच्या तंद्रीत तो धड जेवत नाही हे बघून धकलीने त्याच्या अंगाला हात लावून बघितलं. गार पाण्याच्या बादल्या डोक्यावर ओतल्यामुळेच कि काय त्याचं अंग जरा गरम लागलं. म्हणून त्याला जेवायला घालून धकलीने पांघरूण घालून माच्यावर आडवा केला.

एवढयात चाहूल लागली म्हणून तिने रांधपाच्या खोलीच्या बारक्या खिडकीतूनच बावीवरच्या द्रोणीकडे नजर टाकली. सहदेव पाय धुवायला गेलेला दिसला. ती स्वतःशीच बडबडली.’वेगीन् इले कशे हे? काम झाला नाय कि काय.’

खरं तर आज त्याच्याजवळ पुरे पैसे नव्हतेच. तो फक्त जनावर बघून, विसार देऊन येणार होता.

माहितीतल्या पाव्हण्यानेच तालुक्याला त्याला खबर दिलेली म्हणून तो केवळ व्यवहार पक्का करणार होता. पण जनावर पसंत नाहीच पडलं नि वर हेड्याने ताणून धरलं.

बघू पुढच्या वेळी असं ठरवून येताना त्याने तिठयावर थांबणारी एसटी पकडली म्हणून तो जरा लवकरच आला.

‘पोरा जेवली काय गो?’

‘तऽऽऽर. अजून काय करू तेंका थांबवून. मियाओ बसणारच होतंय. तुमका पावणो भेटलो नाय् कि? वाट बगलास नाय् तेची?’

‘काय करू वाट बगून. जनावर काय पास होयंसा नाय. नि हेडो मेलो घाटावरचो. अडवून धरल्यान्. मगे तेचो नाद सोडलंय नि एसटी पकाडलंय्. चल बाय्. वाढ बेगीन. भूकेचो डोंब निसतो. मेल्यान् चायचा पाणीओ नाय् दिल्यान्.’

‘हाटलात पिऊची मगे. अशेच उपाशी कित्या ऱ्हवलास?’

‘नाय् गो. त्या धोंडया गांवकराचो पावणो भेटलो नि गेल्लंलाव रामाच्या हाट्लात. मेलो बंद करान खंय मराक् गेलो देव जाणां. हो आणि निजान् ऱ्हवंलो कित्या?’

‘तुमी इलास म्हणान् शाळेत जावंक् नाय नि अजूनच एक गोंधळ घालून ठेवल्यान् हा.’

‘ह्या आणि काय नवीन?’

‘पोरग्याची जात. व्हाळापलिकडे कायसा वाजत होता नि हो नाचाक् लागलो. वर आणि बावीचा गार पाणी. थरथरत ऱ्हवलो निस्तो. तिणा मगे तेका काय काय इचारूक सुरवात केल्यान्. भरा मिया मधे पड्लंय. न्हायतं देवचार इलो म्हणान् वाडीयेतसून सगळयांका घेऊन येवची.’

‘निजलो कित्या मगे?’

‘गार पाण्यान् कणकण येव्ची नाय्? बालड्यो भरान् ओतीव्हतो डोस्क्यावर. न्हवांदेत. उटल्यावर मगे बरा वाटतलां.’

‘एद्या न्हानपणीं असला काय उपेगाचा नाय. बाय माजे; मिया शिकलंय् म्हणान् ह्या खावक भेटता. निस्त्या भातजमिनीवर काय होतंला. तेचा शिक्षान होऊकंच होया बाय.’

‘तां होतला हो. पण कसल्या तंद्रीयेत् असता देव जाणा.’

‘पण उत्सवात त्या बाया वाढतंत् थंय पाटवू नुको हां. भलताच कायतरी.’

‘थोरल्येक् तुमच्या सांगात कोण? कायतरी इचारी व्हती तेका.’

मग ह्याच विषयावर गप्पा करत सहदेव जेवला तोवर म्हातारीने अंगणात फेऱ्या मारित चाहूल घेतली. पण तिला काय्येक सुगावा लागला नाय्. ....

नंतर एकदा शनिवारी अर्धा दिवस शाळा सुटली नि वाशा घरी निघाला तेव्हां त्याचं लक्ष सहज भावईच्या देवळाकडे गेलं. चैत्री नवरात्र नुकतंच संपलं होतं. कळसावर नवीन निशाण फडकत होतं. रामनवमीचा नाही तरी आज उद्या पौर्णिमेला घुमटीतल्या मारूतीचा जन्मोत्सव करतात हे माहित होतं. मुद्दाम नाही पण शाळेच्या निमित्ताने येणं झालं तर सुंठवडा खायला वाशा जायचा.

आत्ता मात्र बायामाणसांची थोडीफार गर्दी दिसली. एरवी ह्यावेळीं चिटपांखरू नसायचं. पण भावई मातृदेवता म्हणजे शितळादेवी. लहानग्याना देवीच्या पायांवर घालायसाठी नवरात्रानंतर बायाबापड्या येत. आजही थोडीफार वर्दळ दिसली म्हणून वाशा आत शिरला. अंधाऱ्या गाभाऱ्यात निऱ्या पसरवून हिरवं लुगडं नेसवलेली भावईची काळया पाषाणाची नि कवड्यांच्या वटारल्यासारख्या दिसणाऱ्या डोळयांची मूर्ती एकुलत्या एका टांगलेल्या

लामणदिव्याच्या प्रकाशात जरा भयाणच वाटली. हल्लीच काळोख्या भिंतीवर लावलेल्या टयूबलाईटचा फारसा उजेड पडत नव्हताच. उलट आणखीच भयाण वाटायला लागलं होतं.....

तो नमस्कार करून सगळयांच्या मागून गाभाऱ्याला प्रदक्षिणा घालून उजवीकडून बाहेर आला तो त्याचं लक्ष भिंतीकडेनी उभ्या केलेल्या साताठ अवसरांकडे गेलं. गुळगुळीत पॉलिश केल्यासारखे कुळकुळीत काळे मुसळाएवढे खांबच वाटले त्याला ते. त्याच्या उंचीच्या वर त्याना चुण्या करून लुगडी नेसवलेली नि टोकाला मुखवटे, हात, त्रिशूळ असलं कायबाय् बसवलेलं. त्याने हात लावून बघितलं तर गाभाऱ्यात कौल लावायला बसलेला गुरव बाहेर येत त्याच्यावर खेकसला!

त्याला वाटलं आपला तुक्यादादा हे एवढे कसे पेलत असेल. आता उत्सव आलाच आहे तोंडावर. अक्षय तृतियेला. तेव्हां पालखीबरोबर गांवात फिरायला मजा येईल. पण नेहमी हे सारं परिक्षांच्या तोंडावर येई. म्हणून सहदेव एकटाच येई. तुक्याच्या मदतीला. मात्र धकली पोरांना जागरण करू देत नसे. अभ्यास बुडेल म्हणून.

विचारांच्या तंद्रीत तो मागच्या अंगाला डगरीवर असलेल्या चिंचेखाली आला. गाभुळल्या चिंचा पोरांबरोबर थोरंही पळवीत. झाड देवाचं. म्हणजे देवस्थानचं. कोण कोणाला बोलणार. शिवाय त्याखाली उत्सवाच्या समाराधनेसाठी जेवण बनवण्याची चिऱ्यांची मोठी चुलाणं नि बाजूलाच बाव. तिथेच एक हिरवं लुगडंवाली बाई केस मोकळे सोडून घुमताना दिसली. आयाबाया तिला कायतरी विचारत होत्या नि पोरं तिच्या पायावर घालीत होत्या.

तिने कुणा परकऱ्या पोरीच्या डोक्यावर हात ठेवलान् नि मग तीही घुमायला लागली.

बावीशेजारची भरलेली कळशी घेऊन तिने त्या पोरीच्या डोक्यावर रिती केली. तशी ती पोर गारठून आणखीच थरथरायला लागली. वाशाला त्या

दिवसाची आठवण आली. थोरली काकी कायबाय विचारीत होती तशीच ही बाईसुद्धा त्या पोरीला गदगदा हलवून काय बाय बडबडायला लागली. भीतिने वाशा तिथून पळाला. दूर उभा राहून पहात होता तो लोकं बडबडायला लागली ते त्याने ऐकलं.

'ह्या आनि काय? त्या चेडवाच्याओ वारा इला कि काय? आता पालख्येम्होरा घुमात.'. .

वाशाला आठवलं गुढस्ताही अशाच बाया वाढलेल्या. पालखीच्या आधीच. नि मग त्याही वराती सारख्या पालखीपुढे घुमत होत्या. अंगाला आळोखे पिळोखे देत नि हातातला लिंबाचा टाळा नाचवत. अंगावरच्या कपडयांची नि मोकळया केसांची पर्वा न करता आरडत होत्या नि घुमत होत्या. त्यावेळी त्यांची भीति वाटली नव्हती. कारण धकलीने त्याला आधीच सांगून ठेवलं होतं कि'असल्या बाया वाढण्याने कांही होत नाही. अभ्यास कर त्यापेक्षा.'

त्या दिवशीही थंड पाण्याच्या बादल्या डोक्यावर ओतून कुडकुडणाऱ्या वाशाला थोरली काकी असंच कायसं समजून कांहीतरी विचारायला लागली. आयशीने वेळीच घरात नेलं नसतं तर काकीने गांव गोळा केला असता. बापूस काय रागावला होता. म्हणाला होता . .

'मायझंया, शाळेक् दांडीयो मारान् ह्या आनि कशाक्? शिकतला कोण मगे? बापूस तुजो? माज्या बापसान् शिकवल्यान नि मियां थोडातरी शिकलंय् म्हणान् चार पैशे भेटतंत.'

'अवो मिया टायमावर गेल्लंय् म्हणान् नायतर बाबारेऽऽऽ माज्या, थोरल्येन् तेचो देवचार करान् टाकल्यान् होता.'..

आत्ता मात्र हे समोरचं दृष्य बघून तो सरळ तिथून सटकला. कारण त्या पोरीसारखंच आपल्याही डोक्यावर पाणी ओतलं तर असलंच कायतरी होईल ही भीति. शिवाय गुरवाचा बजा ताशा वाजवायला लागला तर मग डोलत रहायला बरं वाटतं त्या दिवसासारखं. पण बापूस मग झोडून काढील. आपण घरीच जावं म्हणून तो परतला. पण घरी आल्या आल्या आयशीला हे सांगितल्याशिवाय त्याला रहावेना. मग बापसाआधी तीच रागावली. म्हणाली.. .

'उत्सवात पालख्येसाटना काय मिया तुका पाठवूचंय नाय.'

'गे, मगे तुक्यादादाचे वांगडा कोन ऱ्हवतला? आनि ती दीपमाळ कोन पाजळनार?'

'तुका पंचाती कशाक? तुजे बाप्पा येवचे हत पालख्येच्या आधीच. आनि तुका सांगान् ठेवतंय् थोरल्येन बोलावल्यान् तरी जावचा नाय. सांग तिका माजो अब्यास असा.'

धकलीने सारं जसं ठरवून ठेवलं होतं तसंच आपल्या झिलाला पढवून ठेवलंन्. तरी आठदहा दिवसात उत्सवाची तयारी सुरू झालेली वाशाने पाह्यलीन् होती. आईस काय आपल्याला पाठवायची नाय ह्याची त्याला खात्रीच होती. म्हणून मधेच तो देवळाकडे चक्कर टाकून येई...

उत्सवाच्या दिवशी सकाळपास्नंच थोरली पावसकरीण कोरं लुगडं नेसून तयार होतीच. सतरांदा तुक्याला अवसरांचं कायबाय विचारत होती. मासळीसाठी जीव गहाण टाकणारी म्हातारी सुनेला ओशट काय करू नको' म्हणून बजावत होती. धकलीला सारं ऐकू येत होतं. तिचं लक्ष सहदेवाच्या वाटेकडे होतं. त्याला नोकरीच्या ठिकाणची आपली खोली आवरून यायला संध्याकाळ होणार. तेवढयात तुक्याने दीपमाळेसाठी वाशाला विचारलं तर काय सांगायचं हेही तिने ठरवून ठेवलं होतं.

तिला वाटलं होतं तसंच झालं. तुक्या बामणवाडयातून भटणीकडून तेलवाती घेऊन आला तो वाशाला बोलवायला. वाशाला आज

उत्सवामुळे अर्धाच दिवस शाळा. पण वाशाआधीच धकलीने त्याला संध्याकाळचा सहदेवाचा वायदा ऐकवला. तुक्या बिचारा दुपार टळताच निघाला तेव्हां सुमतिला पोरांवर लक्ष ठेवायला सांगून म्हातारीही निघाली. रात्रीच्या वेळी पोराना घेऊन पालखीसाठी जाता येत नव्हतं म्हणून नाराज असलेली सुमति ह्यावेळी मात्र वैतागून म्हातारीला बोलली. म्हणाली . .

'तुमका काय भावयच्ये ओटीयो भरूक जांवचा लागतंला? पोरग्यांहारी बगलास तर मिया जावंचय् नाय्?'

'बाय माज्ये.. बराच बोलतंस गो खुळग्या म्हनताना.' मग म्हातारी झिलाकडे वळून म्हणाली..'रे बाबी, तुज्या व्हकलेक् कोण गुरू भेटलो कि देवचार नडलो? बोलतांहा बग कसा.'

तिच्याकडे दुर्लक्ष करून तुक्या पुढे झाल्यावर तिला मागून जावंच लागलं. गांवात जाऊन गजाली करायला तिला हीच संधी होती.

सुमति घरात एकटी म्हणून तुक्याने पडवीचा मधला दरवाजा उघडून ठेवला होता. तिथून धकलीला सगळा संवाद ऐकू आला. म्हातारी बोलली तो सुमतिचा गुरू आपणच. आपल्यालाच म्हातारी आडून बोलली हे तिला समजलं. ती मनाशीच हंसली. एकदा वाटलं सुमतिला म्हणावं

'गो सुने, जावंचा तर जा बापडी. मिया आसंय् घराकडेन् तुज्या झिलांका बगूक.'

बोलली मात्र कांहीच नाही. वाशाला अभ्यासाला बसवून कमळयाचे केस विंचरायला लागली. सुमतिही मग संध्याकाळच्या रांधपासाठी घरात गेली. उगाच लाईटी लावायला नको म्हणून अजूनही तिला दिवसाउजेडीच रांधून ठेवायची संवय होती. पण चूल पेटली तरी तिच्या डोक्यातला पालखीचा विचार तिला अस्वस्थ करत होता. आपला नवरा मानकरी म्हणून अवसर धरून पालखीबरोबर जाणार नि आपण घरात बसून रहाणार. शिवाय पोरग्यांच्यासाठी भावईची ओटीही भरायची असते; ती काय म्हातारी थोडीच भरणाराय्. कुणाजवळ तरी देईल भरायला नि आपल्याला मात्र

घरात बसवून गेली गांववाल्यांशी गजाली करायला. ती काकीबाय कशी घरात रहाते. तिलाच विचारावं कां? असल्या विचारानी डोकं शिणवताना एका बाजूला भात करून झाला. . .

तिने त्या दिवशीचा वाशाचा सगळा तमाशा बघितला होता त्याची आठवण झाली नि मग मात्र एका तिरमिरीत ती उठली नि तडक बावीवर गेली. वाशासारख्याच बादल्या भरभरून तिने डोक्यावर ओतायला सुरूवात केलीन्. केस नि लुगडं भिजल्यावर ती थरथरायला लागली. इकडे रहाटाचा आवाज ऐकून धकली बारक्या खिडकीतून डोकावली तर ही बाय आपली पाणी ओततेय नि थरथरतेय्.

'गो सुने , काय करतंहस काय ह्या? ह्या टायमाक कोण न्हातंत कि? नि तासुदिक असा उब्यान्. बायामाणसाची रीत नाय् ही.'

तिचं वाक्य पुरं व्हायच्या आधीच धाडकन् बादली टाकून सुमति पळत सुटली नि आगरातल्या गडग्यावरनं उडी घालून पायवाटेला लागली. धावतच!

'हिच्या काय वाराबिरा इला कि काय?' नि मग अचानक तिच्या डोक्यात प्रकाश पडला.

ही बहुतेक म्हातारीला अद्दल घडवायसाठी अशी धावत सुटली. तीही पोरग्याना टाकून. मग धकली पुढच्या पडवीत आली. शेजारचं दार आतून बंद करून पोराना आपल्या पडवीत घेऊन आली तोच सहदेव येऊन उभा. त्याला परत गांवात परतायचं होतं. तुक्यासोबत जायला.

'ह्या आनि बगा सुनेन् काय केल्यान् तां. पोरग्यांका टाकून देवळाकडे पळत सुटलीहा. तीपन अशी वलेत्यान्च. ते रोजा आपल्या झिलान् केल्यान् तसाच.'

'मिया बगलंलय् तिका. कसली वारा इल्यासारी धावा होती. तसलाच असतंला कायतरी.'

धकली फक्त हंसली नि म्हणाली.

'मिया जाणतंय तिचा वारा. तुमी आधी पाय धुवून कायतरी खावन घेवा नि मग जावा. रातचो लय टायम होतलो.' पण उशीर झाला म्हणून सहदेव नुसता चहा घेऊन निघाला.

धकलीने जाऊन आधी शेजारची चूल बघितली. लाकडं मागे ओढलेली बघून परत फिरली नि पोरग्यांच्या जेवणाच्या तयारीला लागली. कमळयाने तंवसर व्हयनेच्या धाकटया दोघाना माजघरात आणून बसवलंन् तसा वाशाही उठून आला. निघता निघता त्याच्याकडे बघून सहदेवाने मग धकलीला बजावलंन्.

'ह्या झिलाक् आधी बग हां. घरातच र्‍हवांदे त्याका.'

पोरग्यांची जेवणं उरकून होईतो तिन्हीसांजा टळून गेलेल्या. तुळशीजवळचा दिवा उचलायला ती बाहेर आली तो तिला आरडा ओरडा ऐकू आला. बघते तो वरून पांदीतून झेलपांडत सुमति नि तिच्यामागे लंगडत तुक्या नि मग म्हातारी, खाली उतरले. बडबडत घरापाशी आले. केस विसकटलेले नि कपाळी मळवट भरल्यागत फरपटलेलं कुंकू. अंगाला चिकटून बसलेलं अर्धओलं लुगडं नि गळयात कोणीतरी घातलेली चाफ्याची माळ. सुमतिचा अवतार बघून धकलीने पडवीच्या मधल्या दाराने जाऊन त्यांचं दार उघडलं.



सुमति धप्कन जमिनीवर बसली नि म्हातारी तिच्या पुढयात बसून तिच्या विनवण्या करायला लागली. तुक्या पालखीची सुरवात झाल्यावर अवसर दुसऱ्याच्या हाती सोपवून तिच्यामागे धावला. खुळी म्हणताना सुमतिने दोघानाही छान नमवलंन्!

'गे बाय माजे, मिया पाया पडतंय् गे तुज्या. पण खंयसून इलंस थंय् तू आपली परत जा. ह्या झाडाक् सोड गे बाय माजे.' पण हे झाड आता सुटणार नव्हतं हे फक्त धकलीलाच माहित होतं!

कांहीच न सुचल्यासारखा तुक्या बघतच रहायला.

बरंच कांही सुचल्यामुळे धकली मात्र हंसत हंसत घरात आली. वाटलं सहदेवाला आल्यावर विचारावं. पण नकोच. सुमतिचं हे गुपित असंच राहू दे. म्हणजे तिला कोणी निदान खुळीतरी म्हणणार नाही. वारं येतंय् म्हटल्यावर म्हातारीचं तोंड आधी बंद होईल. बरंय्.

असंच व्हायला हवं.

मग तिच्या लक्षात आलं कि दिराच्याही वारं येई ते ह्याचसाठी बहुतेक! सुंठीवाचून खोकला गेला. ती हंसतच आपल्या माजघरात शिरली. तर समोर कमळी वाशाच्या धपाटा घालून म्हणत होती.

'मेल्या घाबरंवतंस् कित्याक्?'

'काय झालां गो?'

'काय नाय्. तेच्या वारा इला होता. व्हयनेसारक्याच!' असं म्हणून तीही दोघं मग एकमेकाना टाळया देत हंसायला लागली. धकलीसारखीच.



***

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी ही एक सशक्त भाषा आहे. सशक्त म्हणजे – जे भाव मनात आहेत ते अत्यंत तरलपणे आणि अचूकपणे सांगण्याची क्षमता असणे. उदाहरणार्थ या भाषेत बोलणे या एकाच कृतीला बोलला, सांगितले, म्हणाला, सुनावले, ऐकवले, उच्चारले, स्पष्ट केले, बोलून टाकले, सुचवले, कुजबुजला, पुटपुटला, खडसावले, विनवले, असे असंख्य शब्द आहेत आणि या प्रत्येक शब्दाला एक स्वतःची अशी अर्थछटा आहे. आपण जेव्हा आपली भाषा वापरतो तेव्हा या छटा आपण व्यवस्थित बोलू व समजू शकतो. म्हणून मराठी साहित्याचा , वाचनाचा , पुस्तकांचा प्रचार आणि प्रसार भरपूर व्हायला हवा. म्हणजे आता आहे त्याच्या निदान दहा हजार पट. सध्याचा आपला साहित्य व्यवहार हा अगदीच छोट्या विहिरीपुरता मर्यादित झाला आहे. त्याला एखाद्या विशाल महासागराचं रूप द्यायचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आम्हाला तुमची मदत हवी.

ई साहित्यची पुस्तकं विनामूल्य आहेत. ती तुम्ही कोणालाही कितीही देऊ शकता. त्यात दानाचं पुण्य मिळेल आणि खिशाला फ़ारसा खार न लावता. कृपया आपल्या ओळखीच्या किंवा माहितीतल्या लोकांना, संस्थांना, शाळांना, वाचनालयांना, कार्यालयांना , सोसायट्या, गावं, नगरपालिका, ग्रामपंचायत, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला मंडळं यांत ई साहित्यची पुस्तकं पसरवा. त्यांची माहिती पुरवा. आमचे प्रतिनिधी व्हा. (मात्र बिनपगारी फ़ुल अधिकारी).

साहित्य प्रसाराचा हा बांध फ़ुटु दे. वाचू दे लोकांना. मराठी भाषा वैभवशाली होऊ दे.

काहीही मदत लागली तर आम्ही आहोतच. आपल्या उपक्रमांचे फ़ोटो आम्हाला पाठवा.

धन्यवाद

टीम ई साहित्य